




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०६३ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# बजाज पुणे ग्रँड टूरच्या पहिल्या टप्प्याची उत्साहात सुरुवात

## टीसीएस ते आकुर्डी घाट-वळण रस्त्यावर नागरिकांची दुतर्फा गर्दी; उद्धाटनाला ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांची उपस्थिती

पुणे : (समर्थ गांवकरी)

'बजाज पुणे ग्रँड टूर-२०२६' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याला प्रचंड उत्साहात सुरुवात झाली. टीसीएस सर्कल, हिंजवडी येथून सुरू झालेल्या या टप्प्याची विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या उपस्थितीत झेंडा दाखवून औपचारिक सुरूवात झाली. या वेळी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली. पहिल्या टप्प्यातील एकूण अंतर ९१.८ किलोमीटर असून हा टप्पा पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासह मुळशी व मावळ तालुक्यातील



घाट-वळण रस्त्यांवरून जाणारा असल्याने सायकलपटूंना वेग, सहनशक्ती आणि तांत्रिक कौशल्याचा कस लागला. निसर्गरम्य परिसरातून मार्गक्रमण करत माण-अंबवडे गाव कमान-पौड-चाले-नांदगाव-कोळवण-हडशी लेक-जावण-तिकोना पेठ-काले-कडधे-थुगाव-शिवणे-डोणे-सावळे चौक-आढळे बुद्रुक-बेबडओहळ-चंदनवाडी-चांदखेड-कासारसाई-नेरे-मारुंजी-लक्ष्मी चौक-भूमकर चौक-डांगे चौक-श्री संत नामदेव महाराज चौक मार्गे डॉ. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय इन्स्टिट्यूट, आकुर्डी येथे दुपारी सुमारे ४ वाजता या टप्प्याचा समारोप झाला.

जिल्हा प्रशासनाच्यावतीने या टप्प्यासाठी व्यापक तयारी करण्यात आली होती. स्पर्धा मार्गाची पाहणी करून वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा, आरोग्य सेवा तसेच आपत्कालीन सुविधांबाबत सूक्ष्म नियोजन करण्यात आले. काही कालावधीसाठी मार्गांवर वाहतूक वळविण्यात येवून आवश्यक त्या ठिकाणी मार्ग बंद ठेवण्यात आले होते. पोलिस प्रशासनासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी संपूर्ण मार्गावर तैनात होते. स्पर्धा सुरू असतानाच घाट-वळणाच्या रस्त्यांवर सायकलपटू वेग आणि क्षमतेचा सुरेख मिलाफ सादर करताना दिसले. काही ठिकाणी तीव्र वळणे, चढ-उतार व अरुंद रस्ते असल्याने स्पर्धकांसमोर आव्हाने होती; मात्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायकलपटू आत्मविश्वासाने हे आव्हान पेलताना दिसून आले. मार्गावरील ठरावीक ठिकाणी वैद्यकीय मदत, रुग्णवाहिका, तांत्रिक मदत वाहने तसेच रिफ्रेशमेंट पॉइंट्स सज्ज ठेवण्यात आले होते. ड्रोन, सीसीटीव्ही कॅमेरे आणि मोटरसायकल पथकांच्या माध्यमातून सातत्याने स्पर्धा परिसराचे निरीक्षण करण्यात येत होते. स्पर्धेचा समारोपस्थळी सायकलपटूंचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. विजयी तसेच आघाडीवरील सायकलपटूंनी माध्यमांशी संवाद साधताना मार्गाची रचना, निसर्गसौंदर्य आणि भारतीय प्रेक्षकांचा उत्साह अविस्मरणीय असल्याची भावना व्यक्त केली. अनेक परदेशी खेळाडूंनी पुणे जिल्ह्यातील घाटरस्ते हे जागतिक दर्जाच्या सायकल स्पर्धेसाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे मत नोंदविले.

जिल्ह्यातील पर्यटनक्षम स्थळे जागतिक पातळीवर पोहोचावीत, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळावी तसेच तरुणांना क्रीडा व पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने 'बजाज पुणे ग्रँड टूर-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. पहिला टप्पा यशस्वीरीत्या पार पडल्याने आगामी टप्प्यांबाबत सायकलप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली असून ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा पुणे जिल्ह्याच्या क्रीडा, पर्यटन आणि जागतिक प्रतिमेला नवे परिमाण देणारी ठरत आहे.

## थोडक्यात...

### पुणे-दिल्ली विमानाला तब्बल पाच तास उशीर

पुणे (समर्थ गांवकरी) : पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन मंगळवारी सकाळी दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानामुळे प्रवाशांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागले. सकाळी साडेसातच्या सुमारास उड्डाण अपेक्षित असलेल्या विमानाने तब्बल पाच तास उशिराने दुपारी साडेबारा वाजता उड्डाण केले. तांत्रिक बिघाडामुळे विमानाला विलंब झाला असला, तरी दिल्लीला जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. एअर इंडियाचे (एआय 2470) हे विमान पुणे-दिल्ली दरम्यान सकाळी 7.40 वाजता उड्डाण करणार होते. त्यासाठी प्रवासी नेहमीप्रमाणे दोन ते अडीच तास आधीच विमानतळावर दाखल झाले होते. सर्व सुरक्षा तपासणी पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांना वेळेत विमानात बसविण्यात आले.

### कोर्टाची लढाई सुरुच राहणार?

पुणे (समर्थ गांवकरी) : राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्हावर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. दुसरीकडे दोन्ही वेगळे झालेले पक्ष महापालिका निवडणुकीपासून एकत्र येत आहेत. आता सुरु असलेली जिल्हा परिषद निवडणुकीतही अजित पवार राष्ट्रवादी आणि शरद पवार राष्ट्रवादी एकत्र लढणार आहेत. अशातच दिल्लीत सुरु असलेला लढा सुटतो की पुढे लढला जातो, यावर राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहे. यावर हे प्रकरण मांडणारे कायदेतज्ञ अ‍ॅड. असीम सरोदे यांनी स्पष्टता आणली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दोन्ही गट (शरद पवार आणि अजित पवार) सध्या एकत्र येण्याचे किंवा आपसातील मतभेद मिटवण्याचे संकेत देत असले, तरी जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयातील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत हा विषय संपणार नाही, असे मत अ‍ॅड. असीम सरोदे यांनी व्यक्त केले आहे.

# सलग सुट्यांमुळे विमान व ट्रॅव्हल्स तिकिटांचे दर गगनाला

■ प्रवाशांच्या खिशाला फटका

पुणे : (समर्थ गांवकरी)

प्रजासत्ताक दिन सोमवारी आल्याने सलग तीन दिवसांची सुटी मिळाल्याने देशांतर्गत विमान प्रवासाला मोठी मागणी वाढली असून, त्याचा थेट परिणाम तिकिटांच्या दरांवर झाला आहे. त्याचबरोबर पुण्यातून विदर्भ, मराठवाड्यात जाणाऱ्या ट्रॅव्हल्सचे तिकीटदेखील वाढले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या सुटीसह शनिवार ते सोमवार अशी सलग तीन दिवस सुटी मिळाल्याने पर्यटक, कुटुंबे पर्यटनासाठी बाहेर जात आहेत. परिणामी, प्रमुख शहरांदरम्यानच्या विमान तिकिटासह ट्रॅव्हल्सचे दर वाढल्याचे दिसून येत आहे. प्रजासत्ताक दिनाला संचलन पाहण्यासाठी दिल्लीला जाणाऱ्या नागरिकांची संख्या जास्त असते.



त्यामुळे दिल्लीला जाणाऱ्या विमान तिकिटाचे दर शनिवार, रविवारी दुप्पट वाढले आहेत. याशिवाय मुंबई-दिल्ली, पुणे-बंगळुरू, मुंबई-गोवा, पुणे-कोलकाता अशा मार्गांवर तिकिटांचे दर सर्वाधिक वाढले आहेत. इतर दिवशी ४ ते ६ हजार रुपयांत मिळणारी तिकिटे या कालावधीत १० ते १५ हजार रुपयांपर्यंत पोहोचली आहेत. महत्त्वाच्या वेळांच्या फ्लाइट्ससाठी तर दर आणखी जास्त वाढले आहेत. दरवाढीमुळे अनेक प्रवाशांनी रेल्वेकडे मोर्चा वळवला असून, काहींनी प्रवासाची तारीख बदलणे पसंत केले आहे. मात्र, सुटीचा कालावधी मर्यादित असल्याने अनेकांना वाढीव तिकीट दर मोजूनही प्रवास करावा लागत आहे. दरम्यान, विमान कंपन्यांकडून ही दरवाढ हंगामी आणि मागणीवर आधारित असल्याचे सांगण्यात येत आहे. सुटीपूर्वी किमान दोन ते तीन आठवडे आधी बुकिंग केल्यास तुलनेने स्वस्त दर मिळू शकतात. परंतु, ऐनवेळी जाणाऱ्यांना तिकीट दर वाढल्याने सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला चांगलाच फटका आहे. सलग सुट्यांमुळे कामानिमित्त पुण्यात स्थायिक झालेले नागरिक गावी जाण्यासाठी प्राधान्य देतात. त्यामुळे या काळात प्रवाशांची गर्दी होते. याच संधीचा फायदा घेऊन ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून शनिवार, रविवारी पुण्यातून मराठवाडा, विदर्भ, कोकण, खान्देशात जाणाऱ्या ट्रॅव्हल्सचे तिकीट दर दीडपट वाढविले आहेत. त्याचा प्रवाशांना फटका बसत आहे. शिवाय रेल्वेचे बुकिंग दोन महिने फुल्ल असल्याने ऐनवेळी रेल्वेला तिकीट मिळत नाही. त्यामुळे प्रवाशांना नाइलाजाने ट्रॅव्हल्सचा आधार घ्यावा लागतो. याच संधीचा फायदा खासगी कंपन्यांकडून घेण्यात येत आहे.

रेल्वेचे आरक्षण दोन महिन्यांपूर्वी करण्याची सुविधा आहे. त्यामुळे हजारो प्रवासी अगोदर आरक्षण करून रेल्वेने प्रवास करतात. परंतु, सुटीच्या काळात ऐनवेळी प्रवास करणाऱ्यांना तिकीट मिळत नाही. अगोदर आरक्षण करण्याची सुविधा असल्याने वेटिंग लिस्ट वाढले आहे. सलग सुट्या असल्याने रेल्वेला आणखी गर्दी वाढणार आहे. काही मार्गावर रेल्वे प्रशासनाकडून विशेष जादा रेल्वे सोडण्यात आल्या आहेत.

# अपक्षांची मते घटली, मनसे, आपपेक्षाही नोटाला अधिक मते

पुणे: (समर्थ गांवकरी)

पुणे महापालिका निवडणुकीत मनसेला १ लाख ५५ हजार ७८८ तर आम आदमी पार्टीला ५० हजार ५१७ मते मिळाली आहेत. त्यापेक्षा जास्त मते पुणेकरांनी नोटाला तब्बल २ लाख २१ हजार २२२ मते दिली आहेत. २०१७ च्या पालिका निवडणुकीत १ लाख ७१ हजार ५८१ नोटाला मते होती. त्यामुळे गेल्या निवडणुकीपेक्षा नोटाला ४९ हजार ६४१ मते वाढली आहेत. २०१७ च्या पालिका निवडणुकीपेक्षा अपक्ष उमेदवारांना १ लाख ८८ हजार ४४१ मते कमी मिळाली आहेत. पालिका निवडणुकीत मतविभाजनामुळेच भाजप ११९ च जागा मिळू शकले आहे. या मतविभाजनामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) २१, कॉंग्रेसचे ४, शिंदेसेना १ आणि उद्धवसेनेच्या २ उमेदवारांचा पराभव झाला आहे. पुणे महापालिका निवडणुकीत भाजप ११९, दोन्ही राष्ट्रवादी ३०, कॉंग्रेस १५ आणि उद्धवसेना १ जागा मिळाली आहे. मनसे, शिंदेसेना, आपला एकही जागा मिळालेली नाही. पुणे महापालिका निवडणुकीत चार सदस्यीय प्रभाग होता. त्यामुळे एक मतदाराला चार मते द्यायची होती. त्यामुळे या निवडणुकीत ७४ लाख ६३ हजार ८२४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला आहे. त्यात नोटाला २ लाख १६ हजार मते मिळाली आहेत. त्यामुळे पुणेकरांनी 'नोटा'चा पर्याय निवडला असून, हे एकूण मतदानाच्या जवळपास ३ टक्के आहे. पुणे महापालिका निवडणुकीत पहिल्यांदाच उतरलेल्या आम आदमी पार्टीला ५० हजार ५१७ तर मनसेला १ लाख ५५ हजार ७८८ मते मिळाली आहेत.

# एमपीएड, एमएड सीईटी प्रवेश नोंदणीसाठी १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

पुणे : (समर्थ गांवकरी)

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी घेतल्या जाणाऱ्या मास्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन (एमपीएड) आणि मास्टर ऑफ एज्युकेशन (एमएड) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सीईटीची प्रवेश नोंदणीची मुदत २० जानेवारीपर्यंत होते. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने या दोन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेश नोंदणीस १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याची नोंदणी ५ जानेवारीला सुरू झाली आहे. आजपर्यंत एमपीएडसाठी १०३८, तर एमएडसाठी १२३४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. एमपीएडची प्रवेश परीक्षा २४ मार्च आणि फिल्ड परीक्षा २५ मार्च २०२६ रोजी होणार आहे. एमएडची प्रवेश परीक्षा २५ मार्च २०२६ रोजी होईल. यासाठी ऑनलाइन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका www.



mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. मागील वर्षी या दोन प्रवेश परीक्षेत ६१९३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या नोंदणीसाठी अपार आयडी व युडीआयडी बंधनकारक असून, ज्या उमेदवारांनी अद्याप त्यांचा अपार आयडी तयार केलेला नाही त्यांनी तो डिजिलॉकरद्वारे तयार करावा. अधिक माहितीसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहनही सीईटी कक्षाने केले आहे.

# रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये मृतदेह गायब? नातेवाइकांचा गंभीर आरोप

## प्रशासनाकडून मात्र सारवासारव

पुणे: (समर्थ गांवकरी)

प्रशिक्षणार्थी डॉक्टरची आत्महत्या, किडनी रॅकेट, प्रयोगशाळा सहायकाची आत्महत्या अशा एक ना अनेक प्रकरणांमुळे वादात राहिलेल्या रुबी हॉल हॉस्पिटलमधील आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रुग्णालयात मृत्यू झालेल्या एका ५५ वर्षीय महिलेचा मृतदेह गायब झाल्याचा दावा नातेवाइकांनी मंगळवारी (दि. २०) केला. अकलूज येथील स्मिता भगत या महिला रुग्ण रविवारी (दि. १८) रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल झाल्या होत्या. मात्र, उपचारादरम्यान सोमवारी (दि. १९) रात्री १०:००च्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांचा मृतदेह ताब्यात घेण्यासाठी नातेवाइक हॉस्पिटल प्रशासनाशी संपर्क साधत होते. परंतु, त्यांचा मृतदेह देण्यास प्रशासनाने टाळाटाळ केल्याचा आरोप नातेवाइकांनी केला आहे. मंगळवारी स्मिता भगत यांचा मृतदेह एका दुसऱ्याच रुग्णवाहिकेतून नातेवाइकांसमोर बाहेरून आणण्यात आल्याने नातेवाइकांनी आक्षेप घेऊन हॉस्पिटल प्रशासनावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याबाबत नातेवाइक कोरेगाव पार्क पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यासाठी गेले असता अद्याप गुन्हा नोंद होऊ शकला नाही.

दरम्यान, रुग्णालय प्रशासनाकडून सुरुवातीला असा कोणताच प्रकार घडला नसल्याचा पवित्रा घेतला होता. मात्र, नातेवाइकांनी पोलिसात गुन्हा दाखल करण्याचा पवित्रा घेतल्याने रुग्णालय प्रशासनाने सारवासारव करत ससून रोड येथील कोल्ड स्टोरेज दुरुस्तीच्या कामामुळे संबंधित मृतदेह




तात्पुरत्या स्वरुपात रुबी हॉल, वानवडी येथे हलविण्यात आला होता. हा मृतदेह पोलिसांच्या समक्ष नातेवाइकांच्या ताब्यात दिल्याचे कळविले आहे.

मृत महिलेच्या मुलाचे मित्र निखिल पाटील यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, महिला रुग्णाला निमोनियाचा त्रास व प्लेटलेट कमी झाल्याने बारामती येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले हाते. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुण्यातील रूबी हॉस्पिटल येथे रविवारी (दि. १८) पाठविण्यात आले. सोमवारी (दि. १९) रात्री १०:००च्या सुमारास उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे नातेवाइकांना सांगण्यात आले. त्यावेळी रुग्णाचे भाचे व इतर नातेवाइकांनी रात्रीच्या वेळी दूरवर असलेल्या माळशिरस तालुक्यातील मूळ गावात मृतदेह घेऊन जाणे शक्य नसल्याने शवागारात मृतदेह ठेवण्याची प्रक्रिया पूर्ण केली. मंगळवारी (दि. २०) मृतदेह ताब्यात देण्याची मागणी केली असता, गेट पाससाठी मृतदेह थांबविण्यात आला.

# एबी फॉर्मवरून धाकधूक

## शेवटच्या क्षणी पक्षांनी उमेदवारांना दिला हिरवा कंदील

पुणे: (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अर्ज दाखल करण्याच्या पूर्वसंध्येला बैठका, पक्षप्रवेश, नाराजी दूर करण्याचा सर्व पक्षांचा खटाटोप सुरू आहे. महापालिका निवडणुकीतील नाट्यमय घडामोडींतून बोध घेत कोणत्याही पक्षाने अधिकृत उमेदवारांना एबी फॉर्म दिले नाही. त्यामुळे आपली उमेदवारी निश्चित झाली आहे की नाही अशी साशंकताही उमेदवारांमध्ये व्यक्त होत होती.

अखेर मंगळवारी रात्री उशिरा सर्वच पक्षांनी एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले. जिल्ह्यातील पक्षीय लढतीचे जवळजवळ स्पष्ट चित्र अंतिम टप्प्यात आले आहे.

काही ठिकाणी दुरंगी तर काही ठिकाणी तिरंगी, चौरंगी लढतीची शक्यता आहे. राजीनामा, उमेदवारी तसचे पक्षप्रवेशामुळे गेल्या आठवड्यापासून राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप, शिंदेसेना, उद्धवसेनेतील रूसवे-फुगवे दूर वरिष्ठ नेत्यांना तारेवरची कसरत करावी लागली होती.




आंबेगाव तालुका वगळता सर्वच ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत. विशेष म्हणजे या निवडणुकीत इंदापूर तालुक्यातील कट्टर विरोधक मानले जाणारे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या मनोमिलनामुळे संपूर्ण राजकीय वातावरणच पलटून गेले आहे. या घडामोडींमध्ये शिंदेसेना आणि भाजपच यांच्या युतीलाही मूर्त रूप आले.

जिल्ह्यातील बहुतांश ठिकाणी ही युती कायम राहत असल्याचे चित्र दिसत आहे. ऐनवेळी अपवादात्मक बदल होण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

# दौंड तालुक्यात जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकांचे वारे

## वरवंड-पारगाव गटात घरातीलच तिकिटासाठी चुरस

वरवंड : (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे बिगुल वाजताच दौंड तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. विविध राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली असून, नव्या इच्छुकांसह अनुभवी व जुने दिग्गजही मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे तालुक्याच्या राजकारणात चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. गावपातळीवर बैठका, संपर्क दौरे, कार्यकर्ता मेळावे सुरू झाले असून वातावरण तापू लागले आहे. प्रत्येक पक्ष आणि गट आपापल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी रणनीती आखत आहे. दुसरीकडे मतदारही संभाव्य उमेदवारांचे सामाजिक कार्य, विकासकामे आणि जनसंपर्क यांची बारकाईने पडताळणी करताना दिसून येत आहेत. दौंड तालुक्यात जिल्हा परिषदचे एकूण सात गट तर पंचायत समितीचे चौदा गण आहेत. यंदाच्या निवडणुकीत आरक्षणामुळे अनेक ठिकाणी राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत. काही इच्छुकांना आरक्षणामुळे माघार घ्यावी लागली आहे, तर काही ठिकाणी अनुकूल आरक्षण निघाल्याने अनेकांनी निवडणुकीसाठी 'गुडघ्याला बाशिंग' बांधले आहे. तालुक्यातील केडगाव आणि वरवंड गटाकडे विशेष लक्ष लागून राहिले आहे. या गटांमध्ये कोणाला उमेदवारी मिळणार, कोणाला डावलले



जाणार, यावर राजकीय चर्चांना उधाण आले आहे. पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाकडे इच्छुक उमेदवारांसह कार्यकर्त्यांचे लक्ष लागले असून, उमेदवारी जाहीर होईपर्यंत उत्सुकता कायम राहणार आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, यंदाच्या निवडणुकीत जातीय व सामाजिक समीकरणांसोबतच स्थानिक विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य आणि रोजगार यासारखे मुद्दे निर्णायक ठरणार आहेत.

# पोदार प्रेपचा वार्षिक क्रीडा दिन उत्साहात साजरा

## 'जंबो इन स्ट्रिंग्स अँड स्प्रिंट्स' संकल्पनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

(समर्थ गांवकरी)

पोदार प्रिप (Podar Prep) शाळेचा २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक क्रीडा दिन 'जंबो इन स्ट्रिंग्स अँड स्प्रिंट्स' (Jumbo in Strings and Sprints) या डॉ. स्वाती वत्स (संचालिका, पोदार प्रेप) यांच्या आगळ्या वेगळ्या व आकर्षक संकल्पनेखाली नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. चिमुकल्यांच्या कलागुणांना आणि शारीरिक कौशल्यांना वाव देणाऱ्या या कार्यक्रमाला दैनिक गावकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे (Dr. Vishwasrao Arote, Editor Dainik Gavkari) यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली.

प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन: डॉ. आरोटे यांनी आपल्या भाषणात खेळ आणि शारीरिक हालचालींचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता, खेळाच्या माध्यमातून शिस्त, सांघिक कार्य आणि निरोगी जीवनशैली आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले.

पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका सौ सोनल शुक्ला यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करत पालकांचे शब्दसुमनांनी स्वागत केले.

पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या सौ. मिनाक्षी मिश्रा यांनी पालकांशी संवाद साधताना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी व शिक्षकांनी केलेल्या मेहनतीचे कौतुक केले.

या क्रीडा दिनानिमित्त पूर्व-प्राथमिक मुलांसाठी विविध मजेदार शर्यती, योगासने, रिबन डान्स, अडथळा शर्यती आणि पॅराशूट प्ले यांसारखे नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने यात सहभाग घेतला आणि आपले क्रीडा कौशल्य दाखवून दिले.

मुलांच्या मनोरंजनासोबतच पालकांसाठीही विविध स्पर्धात्मक खेळ आणि उपक्रम आयोजित करण्यात आले होते. पालकांनीही यात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला, ज्यामुळे कार्यक्रमाची रंगत आणखी वाढली.



या वार्षिक क्रीडा दिनाला उपस्थित असलेल्या पालकांकडून कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल आणि मुलांच्या सहभागाबद्दल अत्यंत सकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्या. "मुलांना इतक्या उत्साहाने खेळताना पाहून आम्हाला खूप आनंद झाला," असे एका पालकाने सांगितले. "शाळेने केवळ अभ्यासावरच नव्हे, तर मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावरही भर दिल्याबद्दल आम्ही आभारी आहोत," असे मत दुसऱ्या एका पालकाने व्यक्त केले. मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि पालकांचा उत्साह यामुळे हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

पूर्व-प्राथमिक मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा आणि शारीरिक हालचाली अत्यंत महत्त्वाच्या आहेत. केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकास होण्यासही यातून मदत मिळते. असेही मत काही उपस्थित पालकांनी व्यक्त केले.

खेळामुळे पूर्व-प्राथमिक मुलांमध्ये विकसित होणारी प्रमुख कौशल्ये:

शारीरिक विकास: धावणे, उड्या मारणे, फेकणे आणि पकडणे यांसारख्या हालचालींमुळे मुलांची स्नायूशक्ती, संतुलन (balance) आणि शरीराचा समन्वय (coordination) सुधारतो.

संज्ञानात्मक कौशल्ये: खेळांदरम्यान मुलांना नियम समजून घ्यावे लागतात, समस्या सोडवाव्या लागतात आणि त्वरीत निर्णय घ्यावे लागतात, ज्यामुळे त्यांच्या विचार करण्याच्या क्षमता (cognitive skills) वाढतात.

सामाजिक आणि भावनिक विकास: सांघिक खेळामुळे मुलांना एकत्र काम करणे, वाटून घेणे (sharing), एकमेकांना मदत करणे आणि शिस्तबद्ध वर्तन (sportsmanship) शिकायला मिळते.

आत्मविश्वास आणि आत्मसन्मान: शर्यतींमध्ये किंवा उपक्रमांमध्ये भाग घेऊन आणि आपले कौशल्य दाखवून मुलांचा आत्मविश्वास वाढतो आणि स्वतःबद्दलचा आदर निर्माण होतो.

एकाग्रता आणि चिकाटी: खेळताना मुलांना लक्ष केंद्रित करावे लागते, ज्यामुळे त्यांची एकाग्रता वाढते आणि ध्येय पूर्ण करण्याची चिकाटी निर्माण होते.

कार्यक्रमाच्या रूपरेषेपासून ते प्रत्यक्ष मैदानातील व्यवस्थेपर्यंत प्रत्येक गोष्ट पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका व पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शिस्तबद्धरीत्या पार पडली.

मुलांनी सादर केलेले योगासने, रिबन डान्स आणि विविध शर्यतींचे कौशल्य हे शिक्षक वर्गाच्या गेल्या काही आठवड्यांच्या सातत्यपूर्ण सरावाचे फलित होते.

मैदानाची सजावट, विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि तांत्रिक बाबी हाताळणं,चिमुकल्यांना मैदानावर धीर देणे आणि त्यांचा उत्साह वाढवणे यात पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या सर्व शिक्षकांनी मोलाची भूमिका बजावली.

# फुलवळच्या शेतकऱ्यांनी अनुभवली बारामतीची 'हायटेक' शेती; 'कृषिक २०२६' प्रदर्शनास भेट

कंधार : (समर्थ गांवकरी)

कृषी विभाग कंधार यांच्या मार्गदर्शनाखाली ता.कृषि अधिकारी प्रशांत कासराळे यांनी तालुक्यातील अनेक गावातुन शेतकर्याना कृषिप्रदर्श पहाण्यासाठी बारामती येथे पाठवले होते फुलवळ येथील शेतकरी गट आणि 'कृषिमित्र' स्वयंसाहाय्यता गटाच्या सदस्यांनी बारामती येथे आयोजित 'कृषिक २०२६' या भारतातील सर्वात मोठ्या प्रात्यक्षिक कृषी प्रदर्शनास नुकतीच भेट दिली. या दौऱ्यात शेतकऱ्यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि नवनवीन प्रयोगांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती जाणून घेतली.



बारामती येथील कृषी विज्ञान केंद्राच्या १७० एकर प्रक्षेत्रावर हे प्रदर्शन भरले आहे. या भेटीदरम्यान शेतकरी गटाचे अध्यक्ष आणि सदस्यांनी प्रामुख्याने एआय (AI) तंत्रज्ञानावर आधारित ऊस शेती, ठिबक सिंचनाचे आधुनिक मॉडेल, हायड्रोपोनिक्स भाजीपाला आणि ड्रोनद्वारे होणारी फवारणी या स्टॉल्सला भेटी दिल्या. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना या तंत्रज्ञानाचा आपल्या भागात कसा वापर करता येईल, याचे मार्गदर्शन केले. यावेळी फुलवळ येथील प्रगतशील शेतकरी चंदबस मंगनाळे,ज्ञानेश्वर मंगनाळे, उत्तम गोधणे, मधुकर डांगे अदिशेतकऱ्यांनी विविध बियाणे कंपन्या, खत व्यवस्थापन आणि शेती अवजारांच्या स्टॉलवर जाऊन प्रत्यक्ष माहिती घेतली. "बारामतीमधील या प्रात्यक्षिक प्रदर्शनामुळे आम्हाला आधुनिक शेतीची नवी दिशा मिळाली असून, याचा फायदा गावातील शेती सुधारण्यासाठी नक्कीच होईल," असा विश्वास चंदबस मंगनाळे या शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

# सौ. निर्मलाबाई सोनटक्के यांचे निधन

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील लोणी (बु)येथील महिला नागरीक निर्मलाबाई बालाजीराव सोनटक्के (वय ६० वर्ष) यांचे दीर्घ आजाराने दि.२० मंगळवारी रोजी सकाळी निधन झाले असून,त्यांच्या पार्थीवावर दि.२१ बुधवारी रोजी स.१० वा.लोणी ता.अर्धापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. निर्मलाबाई सोनटक्के यांच्या पश्चात २ मुले,१ मुलगी,सुना,नातू,पणतू असा परीवार आहे.त्या साहेबराव सोनटक्के,शिवराज सोनटक्के यांच्या आई होत.



# प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत ओम फायटर्सचा दणदणीत विजय

तामसा : (समर्थ गांवकरी)

हदगाव–हिमायतनगर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत ओम फायटर्स संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात ओम फायटर्सने प्रतिस्पर्धी संघावर मात करत प्रेक्षकांची मने जिंकली.

या स्पर्धेत तालुक्यातील नामांकित संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामना अत्यंत चुरशीचा झाला. प्रथम गोलंदाजी करत ओम फायटर्सने ठराविक षटकांत आणि आक्रमक खेळीचा सुरेख मिलाफ साधला. लक्ष्याचा पाठलाग करताना प्रतिस्पर्धी हे राम संघाला ओम फायटर्सच्या भेदक गोलंदाजीसमोर टिकला नाही.

ओम फायटर्सच्या गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर मारा करत नियमित अंतराने गडी बाद केले. उत्कृष्ट क्षेत्ररक्षणामुळेही सामन्याचे पारडे ओम फायटर्सकडे झुकले.



अंतिम सामन्यातील सामनावीर पुरस्कार गजानन राठोड(चिता) ओम फायटर्सच्या खेळाडूला देण्यात आला.तर "मॅन ऑफ द सिरीज" हे राम क्रिकेट संघ हदगांव चे सूरज देसाई या खेळाडू ला देण्यात आलं, बेस्ट बॉलर पवन (ओम फायटर्स)बेस्ट केच सोनू चिड्डेवार, उपविजेता 'हे राम' हदगांव च्या कर्णधार विलास चव्हाण संघ मालक सिद्दू मनोवर यांनी स्पर्धा कमेटी कडून ट्रॉफी देण्यात आली, तृतीय पारितोषिक तामसा ग्रामपंचायत सदस्य शिवराज वारकड यांच्या तर्फे सद्गुरू क्रिकेट संघ सपोनि नामदेव मद्धे (रेड्डी) यांच्या संघाला देण्यात आलं

विजयानंतर संघाच्या खेळाडूंनी आणि समर्थकांनी जल्लोष केला. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघाला चषक प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात सपोनि शहादेव खेडकर, माधव नारेवाड, शिवराज वारकड, शहाजी जोगदंड, पोउपनि बालाजी नरवटे, शाम नागरगोजे बक्षीस वितरण समारोह त उपस्थित होते. आयोजकांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. या विजयामुळे ओम फायटर्स संघाचे सर्वत्र कौतुक होत असून पुढील स्पर्धांसाठी संघाला शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.@ ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याकरिता दरवर्षी असेच स्पर्धा सामने तालुक्यात होणार असून माझ्याकडून भरघोस आर्थिक योगदान देणार असं मनोगत तामसा चे जुने उत्कृष्ट क्रिकेट खेळाडू माजी सरपंच माधव अण्णा नारेवाड यांनी मांडले. माधव नारेवाड यांच्या कडून प्रथम पारितोषिक ३१ हजार रुपये रोख, व ट्रॉफी देण्यात आली अंतिम सामना चे विजेता ओम फायटर्स तामसा चे संघ मालक रिजवान पठाण व संघ कर्णधार बाळाप्रसाद जाधव यांना ट्रॉफी देण्यात आली..स्पर्धा च्या यशस्वी करण्यासाठी आयोजक कमेटी बालाप्रसाद जाधव, ज्ञानेश्वर कोडगीरवार, सुरेश बास्टेवाड,शे. जुनेद, जुनेद पठान, गजानन महाजन यांनी परिश्रम घेतला.

# दिव्यांगतेवर मात करत कलागुणांचा उत्सव

- नांदेडमध्ये भव्य सांस्कृतिक कार्यक्रम
- जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले विद्यार्थ्यांचे कौतुक



नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

दिव्यांग कल्याण आयुक्तालय, जिल्हा परिषद नांदेड व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आज नांदेड येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात भव्य व प्रेरणादायी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्ह्यातील सुमारे 58 मुकबधिर, अंध, मतिमंद व अपंग विद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे सशक्त दर्शन घडविले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महान समाजसुधारिका हेलन केलर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, सहाय्यक संचालक दिनकर नाठे, अधिक्षक बळीराम येरपूलवार, माजी प्राचार्य पंजाबराव अंभोरे, डॉ. सान्वी जेठवाणी, भार्गवी देशमुख, सुधीर फुसांडे, रमेश वडगावकर, सीएम फेलो भार्गवी मुंढे, अर्थव मुळक, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, शुभम तेलेवार, जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे, साईचरण मुगावे आदींची उपस्थिती होती.

दिव्यांगतेवर मात करत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपूर्ण प्रेक्षागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. गाडी झुमक्याची, शेतकरी नृत्य, चला जेजुरीला जाऊ, राधे-राधे, मल्हारी मिक्स गीत, दैवत छत्रपती, दोनच राजे इथे गाजले पावन पुण्य भूमीवर, काठी न घोंगड घेऊद्या की, राणू मुंबई की राणू, आदिवासी ठेमसा गीत, आया रे तुफान-छावा, रिमिक्स जलवा, माऊली-माऊली, गरीब मुलांचे शिक्षणासाठीच्या संघर्षाचे सादरीकरणासह भावगीत, लावणी व गीतगायन अशा विविध सादरीकरणांना उपस्थितांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

# निवडणूकीचे ठरणार भवितव्य

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

राज्यातील १२ जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळीला सुरूवात झालेली असताना आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या उर्वरित जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे भवितव्य आज बुधवारी (दि.२१) ठरणार आहे. आरक्षण संदर्भात सर्वोच्च न्यायालयात बुधवारी सुनावणी होणार आहे. याशिवाय आरक्षण सोडत, एकाचवेळी निवडणुका याबाबत देखील सुनावणी घेतली जाणार आहे. त्यामुळे या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समिती यांच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली. त्यानुसार, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, कोल्हापूर, लातूर, पुणे, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, कोल्हापूर जिल्ह्यात निवडणुका होत आहेत.



सत्कार नको, कामे सांगा.... प्रभाग 5 च्या नगरसेवकांनी केला प्रश्न सोडवण्याचा प्रारंभ,कवडे नगरचा पाणी प्रश्न अधिकाऱ्यांना बोलावून लावला मार्गी. यावेळी नगरसेवक धनंजय जाधव,जितू गंभीर,जय भोसले, मोहित पंजाबी सह कवडे नगरच्या नागरिक उपस्थित होते



# शिर्डीतील ११५७ बांधकाम मजुरांना मिळाले 'सुरक्षा कवच'

शिर्डी : (समर्थ गांवकरी)

- ९५ लाख रुपयांचा शासकीय निधी वर्ग

देशभरातून येणाऱ्या साईभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डीत विकासाची कामे वेगाने सुरू असतानाच, या विकासाचे शिल्पकार असलेल्या बांधकाम मजुरांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र शासनाचा कामगार विभाग, गोदरेज कंपनी व त्यांच्या सहयोगी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत शिर्डीतील ११५७ बांधकाम कामगारांची अधिकृत नोंदणी पूर्ण करण्यात आली आहे. या कामगारांना सुरक्षा साहित्य व ओळखपत्र प्रदान करण्यात आले असून, त्यांच्या कल्याणासाठी ९५ लाख रुपयांचा शासकीय निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. बांधकाम क्षेत्रात काम करणारे मजूर अनेकदा स्थलांतरित असतात. ओळखपत्रांचा अभाव आणि क्लिष्ट प्रक्रियेमुळे ते शासकीय लाभांपासून वंचित राहतात. ही अडचण ओळखून प्रशासनाने 'सामाजिक सुरक्षा' या संकल्पनेवर भर दिला आहे. या उपक्रमांतर्गत मजुरांना केवळ नोंदणीकृतच केले नाही, तर त्यांना बांधकाम कामगार मंडळ ओळखपत्र देऊन अधिकृत दर्जा मिळवून दिला आहे. मजुरांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनाने शिर्डीत विशेष जनजागृती शिबिरे आयोजित केली. यामध्ये कामगारांना प्रत्यक्ष मदत, मार्गदर्शन, समुपदेशन व आरोग्य तपासणी अशा विविध टप्प्यांतून साहाय्य पुरवण्यात आले. कामगारांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देत, त्यांना आरोग्य सुविधा व कामाच्या ठिकाणी सुरक्षितता प्रदान करणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते.

# प्रांजल अमित चिंतामणी यांची यांची बिनविरोध निवड

## इतर सातही सभापती पदाच्या निवडी करण्यात आल्या जाहीर

जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)

जामखेड ला नगर परिषद शासनाने निर्माण केली. आठ वर्षा पुर्वी नगर परिषद च्या प्रथमच झालेल्या निवडणुकीत भाजप च्या पॅनल मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले होते. एक प्रकारे दारूण पराभव झाला होता.. विषेश म्हणजे विद्यमान सभापती.. प्रा. राम शिंदे हे आमदार म्हणून तालुक्याचे नेतृत्व करत होते. पालकमंत्री होते. पाच खात्या चे मंत्री होते. तरीही त्यांना पराभव पहावा लागला होता...

त्यावेळी सभापती नी निवडणूक हलक्यात घेतली होती. उमेदवार निवडनी मधे दूर्लक्ष.. नियोजन डिसाळ. नवीनांना उमेदवारी दिली गेली. मुळ भाजप कार्यकर्त्यांना डावले गेले होते. प्रचंड नाराजी निर्माण झाली होती.. सामाजिक संतुलन साधले नव्हते.. पर्यायाने भाजप पॅनलचा दारूण पराभव झाला होता.

त्यावेळी झालेल्या चुका पासून बोध घेऊन सभापती नी या वेळी व्यवस्थित नियोजन केले. सोशल इंजिनिअरिंग साधले. समाजातील उपेक्षित घटकांना उमेदवारी दिलया. जो समाज कधीच नगर सेवक पर्यंत गेला नव्हता. ग्राम पंचायत सदस्य सुधा झाले नव्हते. अशा घटकांना उमेदवारी दिली. त्या मुळे या वेळी सर्व घटकांनी भाजप पॅनला मतदान केले. 22 उमेदवारा मधुन 15 नगर सेवक निवडुन आले. नगराध्यक्ष पदी भाजप च्या सौ. प्रांजल अमित चिंतामणी या मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या.

काल विविध उप समिती चे सभापती व सदस्य बिनविरोध निवडले गेले. जामखेड शहरातील भाजप च्या कार्यकर्त्यांमधे उत्साहाचे. आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कर्जत जामखेडचे भूमिपुत्र व महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जामखेड नगर परिषदेवर भाजपाचा झेंडा फडकला. त्यानुसार लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून प्रांजल आणि चिंतामणी यांनी पदभार घेतल्यानंतर नगरपरिषदेतील विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. त्यानुसार आज



झालेल्या निवडीनुसार जामखेड नगर परिषदेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी तर उपनगराध्यक्ष पोपट राळेभात यांची सभापती नियोजन आणि विकास समिती, जया संतोष गव्हाळे यांची सभापती महिला व बालकल्याण समिती, मोहन पवार यांची सभापती सार्वजनिक बांधकाम समिती, वैशाली अर्जुन म्हेत्रे सभापती स्वच्छता वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती, श्रीराम डोके सभापती पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण समिती व प्रवीण सानप सभापती शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती अशा निवडी करण्यात आले आहेत.

लोकनियुक्त नगराध्यक्षा प्रांजल अमित चिंतामणी यांची तर

सह भाजपाला 15 जागांवर विजय मिळून भाजपाने नगरपरिषदेत बहुमताने सत्ता मिळवली. त्यानंतर भाजपाच्या नगरपरिषद गटनेतेपदी तात्याराम पोकळे व उपनगराध्यक्ष म्हणून पोपट राळेभात यांच्या निवडी करण्यात आल्या.

आज दि. १९ जानेवारी रोजी स्थायी समितीच्या झालेल्या निवडीनुसार नगर परिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा प्रांजल अमित चिंतामणी यांची स्थायी समितीच्या सभापती बिनविरोध निवड करण्यात आली, तर स्थायी समितीच्या सदस्यपदी पोपट राळेभात, जया गव्हाळे, मोहन पवार, वैशाली म्हेत्रे, श्रीराम डोके व प्रवीण सानप यांच्या निवडी करण्यात आल्या.

या निवडीबद्दल त्यांचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, बाजार समितीचे सभापती शरद कार्ले, माजी नगरसेवक अमित चिंतामणी आदी मान्यवरांसह विविध स्तरातून व मान्यवरांकडून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

# गगनगिरी महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान पिंपळगाव रोठा,तालुका पारनेर येथे परमपूज्य स्वामी गगनगिरीजी महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

सकाळी ६ वाजता अभिषेक होम हवन यज्ञ व पूर्णाहुती, सरूबाई व पंढरीनाथ वाळुंज,संगीता व ऋषिकेश सोनार, अहिल्यानगर यांच्या हस्ते संपन्न झाली. खंडेश्वर वारकरी शिक्षण संस्था व जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा यांचे विद्यार्थी,विद्यार्थिनी ग्रामस्थ, भाविक भक्त सर्वांच्या उपस्थितीत महाराजांची महाआरती करण्यात आली.




याप्रसंगी उपाध्यक्ष महेश शिरोळे, मा.अध्यक्ष व विश्वस्त अँड.पांडुरंग गायकवाड,विश्वस्त धोंडीभाऊ जगताप, जनार्दन महाराज मुंडे,आकाश महाराज घोलप,माजी सरपंच नानाभाऊ भांबरे,माजी सरपंच बबन पुंडे,माजी विश्वस्त किसन मुंढे,नाथा भांबरे,रंगनाथ वाळुंज,लहू सुंबरे, शंकर गायकवाड,माजी सरपंच शिवाजी ढोमे, जनाभाऊ खोसे, खंडू सुपेकर तसेच पुरोहित बंडूकाका पाटील,महिला व पुरुष भाविक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सकाळी १०.३० वाजता गगनगिरी महाराजांच्या प्रतिमेची रथातून सवाद्य मिरवणूक सुरू झाली.मिरवणुकीमध्ये खंडेश्वर वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी,जय मल्हार विद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी त्यांचे सर्व शिक्षक, कर्मचारी,ग्रामस्थ,माता भगिनी, भाविक भक्त सहभागी झाले होते. भक्तीमय वातावरणात मिरवणुकीने कोठणगडाला प्रदक्षणा घालून आल्यानंतर श्री महाराजांच्या रथातील प्रतिमेची पूजा व महाआरती करण्यात आली.

यानंतर आकाश महाराज घोलप यांचे संगीतमय प्रवचन देवस्थान सभा मंडपामध्ये झाले.त्याच्या भाविक भक्तांनी लाभ घेतला.जय गगनगिरी सेवाभावी मंडळ पिंपळगाव रोठा व संकल्प संजय विश्वासराव ,रा. बेल्हे,ऋषिकेश सोनार अहिल्यानगर यांच्या वतीने सर्व भावी भक्तांना लापशी ,आमटीचा महाप्रसाद भोजन देण्यात आले. भगवान भांबरे व जय गगनगिरी सेवाभावी मंडळ कार्यकर्ते यांनी नियोजनात सेवा व सहकारी दिले.

# आजींच्या अस्थींचे रूपांतर केले झाडात

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

जगतगुरु संत तुकाराम महाराज आपल्या एका अभंगातील ओळीत असे म्हणतात कि "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे,, त्यात ते अखंड विश्वाला सांगतात कि वृक्ष वेळी आणि प्राणी हे आपले सवंगडी आहेत या अभंगातील ओळीच्या माध्यमातून ते निसर्गाशी असलेले आपले अतूट नाते दर्शवत आहेत माणूस आणि निसर्ग यांच्यातील स्नेहभाव आणि परस्परावलंबित्वाचे सुंदर चित्र ते आपणास त्यांच्या या अभंगातील ओळीच्या माध्यमातून ते आपल्या पुढे मांडत आहेत निसर्गातील प्रत्येक गोष्ट कोणत्या न कोणत्या कारणास्तव आपल्याशी घट्ट नात्याने ती जोडलेली आहे त्यामुळे निसर्गाला जपा तरच निसर्ग देखिल आपल्याला देखिल जपेल हेच निसर्गाशी असलेले आपले नाते जपून दि २०/०१/२०२६ वार मंगळवार या



दिवशी लेनाड गावातील एक प्रतिष्ठित व आदर्शमय वेक्तीमत्व श्री प्रकाश दादा व श्री सुनिल दादा भोंडीवले यांनी आपल्या आजींना श्रद्धांजली म्हणून नदी प्रदूषित न करता, आजींच्या अस्थींचे रूपांतर झाडात केले हे झाड म्हणजेच तिची आठवण,तिचे संस्कार आणि तिचे आशीर्वाद असतील असे भावनिक मत त्यांनी यावेळी आपले बोलून दाखवले

भोंडिवले कुटुंबाचा निर्णय निसर्गासाठी,आणि त्यांच्या कै. शांताबाई कृष्णा भोंडीवले आजीच्या स्मरणार्थ...घेतलेला एक आदर्शमय आणि उल्लेखनीय उपक्रम आहे पुन्हा एकदा भोंडीवले परिवार व ग्रामस्थ मंडळ लेनाड बु कडून आजींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत जि प प्राथ शाळा केळीरूम्हणवाडीच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा



**(समर्थ गांवकरी)**

आज दि 20.01.2026 रोजी जिल्हा परिषद अहिल्यानगर आयोजित तालुका क्रीडा स्पर्धा अकोले या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या. त्यात खो खो या क्रीडा प्रकारात मोठा गट मुले व मोठा गट मुली यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून आपल्या शाळेची यशाची परंपरा कायम ठेवली. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी पंचायत समिती अकोलेचे गटशिक्षणाधिकारी मा. अरविंदजी कुमावत साहेब,समशेरपूर बीटाच्या आदरणीय विस्तार अधिकारी श्रीम. फापाळे मॅडम, केंद्राच्या केंद्रप्रमुख आदरणीय श्रीम. खतोडे मॅडम, बीटातील व केंद्रातील सर्व शिक्षकवृंद, केळीरूम्हणवाडी शाळेचे मुख्याध्यापक श्री. गायकवाड सर, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व मान्यवर सदस्य या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले मोठा गट मुले व मुली (खो खो ) या क्रीडा प्रकारात घवघवीत यश मिळवून देणारे क्रीडाप्रेमी, उत्कृष्ट मार्गदर्शक, राष्ट्रीय खो खो पंच श्री. दिपकजी सुकटे सर यांचे विशेष अभिनंदन.

## 'Fumage' चे अनावरण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

टायटनच्या प्रीमियम घड्याळ ब्रँड Edge by Titan ने 'Fumage' या नव्या कलेक्शनचे अनावरण केले आहे. नवीन भूमिती, पुनर्रचित सिरेमिक ब्रेसलेट



आणि फ्युमे (fumé) डायलसह सादर झालेले हे घड्याळ Edge पोर्टफोलिओमधील तीन वर्षांनंतरचे पहिले नवीन सिरेमिक केस आहे. हे लाँच ब्रँडसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरून, अधिक स्लीक प्रोफाइल, टिकाऊ केस आर्किटेक्चर आणि हाताने तयार केलेल्या ग्रेडियंट डायलसह साहित्याच्या दिशेतील बदल अधोरेखित करते. धुराच्या तरल हालचालींनी प्रेरित झालेली Fumage ची रचना नियंत्रित अराजक (Controlled Chaos) ही संकल्पना मांडते.



# प्रा. योगेश साईनाथ माने यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच. डी. पदवी!


**नारायणगाव : (समर्थ गांवकरी)**

माननीय बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील वाणिज्य विभागात कार्यरत असलेले प्रा. योगेश साईनाथ माने यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून दि. १६ जानेवारी २०२६ रोजी वाणिज्य शाखेत विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली. प्रा. माने यांनी "Role of Non-Agricultural Co-operative Credit Societies in Employment Generation and Rural Development : A Critical Study" या समकालीन व समाजोपयोगी विषयावर संशोधन पूर्ण केले. या संशोधनात ग्रामीण रोजगारनिर्मिती, स्वयंरोजगार, आर्थिक सक्षमीकरण व सहकारी चळवळीचा ग्रामीण विकासावर होणारा परिणाम यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. हे संशोधन ग्रामोन्नती मंडळ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथून पूर्ण झाले असून त्यांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून डॉ. जे. पी. भोसले व डॉ. एच. एम. जरे यांचे मार्गदर्शन लाभले. पीएच.डी. पदवी मिळाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी, विद्यार्थी व कुटुंबीयांनी प्रा. माने यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## क्रांतिकारी संत सेवालाल महाराज जयंती मंडळाचे अध्यक्ष साई राठोड तर उपाध्यक्ष मारोती राठोड व वसंत जाधव – भोकर

**भोकर: (समर्थ गांवकरी)**

बंजारा समाजाचे आराध्य दैवत क्रांतिकारी संत सेवालाल महाराज जयंती , क्रांतिकारी संत सेवालाल महाराज स्मारक समिती भोकर यांच्या वतीने दिनांक 18 वार रविवार रोजी भोकर येथील सुर्या हॉस्पिटल येथे सर्व बंजारा समाज बांधव यांच्या उपस्थितीमध्ये बैठक घेण्यात आले.या बैठकीत क्रांतिकारी संत सेवालाल महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ. यू एल जाधव याच्या मार्गदर्शनाखाली सर्व समितीचे पदाधिकारी यांच्या नेतृत्वात बैठकीचे आयोजन करण्यात आले,या बैठकीचे महत्व प्रस्तावना प्रा.गणेश जाधव यांनी केले .येणाऱ्या 15 फेब्रुवारी रोजी तिथीप्रमाणे या वर्षी क्रांतिकारी संत सेवालाल महाराज जयंती सर्व समाज बांधव यांच्या उपस्थितीमध्ये तारिक ठरवण्यात आले.व तसेच जयंती यशस्वीरित्या पार पडावी यासाठी



जयंती मंडळ स्थापन करण्यात आले व कार्यकारणी जाहीर केले. ,येणाऱ्या 15 फेब्रुवारी रोजी क्रांतिकारी संत सेवालाल महाराज जयंती मंडळ , क्रांतिकारी संत सेवालाल महाराज स्मारक समिती यांच्याकडून अध्यक्ष मा. साई राठोड तर उपाध्यक्ष मारोती राठोड व वसंत जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आले आहे, कार्याध्यक्ष म्हणून रमेश राठोड ,सचिव सखाराम राठोड , जयंती मंडळ प्रसिद्ध प्रमुख विशाल जाधव , सह प्रसिद्धी मनोज राठोड ,कोषाध्यक्ष प्रफुल राठोड ,संघटक धोंडू राठोड ,सहसंघटक प्रकाश राठोड , किशोर जाधव, दत्ता जाधव, साहेबराव जाधव, बालाजी जाधव , राहुल जाधव, योगेश जाधव, ज्ञानेश्वर राठोड, नामदेव जाधव, सल्लागार म्हणून आप्पाराव राठोड, गणेश राठोड, बालाजी राठोड, रोहिदास जाधव, बालाजी जाधव, डॉ.राम नाईक जाधव , प्रा. गणेश जाधव , दिगंबर राठोड,बाळू महाराज,रमेश चव्हाण , कैलास राठोड यांची सर्वानुमते निवड करण्यात आले आहे.

येणाऱ्या 15 फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहामध्ये जयंती पार पडणार, क्रांतिकारी संत सेवालाल महाराज स्मारक समिती यांच्याकडून यशस्वी निर्णय घेऊन जयंती मंडळ स्थापन करण्यात आले.

## रंगसखा वॉटर कलर पेंटिंग प्रदर्शनाचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मुळच्या विंग कमांडर (निवृत्त) आणि चित्रकार डॉ.मेधा देशपांडे यांच्या रंगसखा या पेंटिंग प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.



हे प्रदर्शन 27 जानेवारी 2026 ते 2 फेब्रुवारी 2026 दरम्यान औंध येथील फेज 1 रोड येथील सनगार्ड बिल्डिंग,वेस्ट एंड सेंटर 1 मधील पीएनजी अँन्ड सन्स येथे सकाळी 11 ते रात्री 8 दरम्यान सुरू राहणार आहे. या प्रदर्शनात निसर्गाने प्रेरित एकूण 25 वॉटर कलर पेंटींग्स प्रदर्शित केली जाणार आहेत. निसर्ग,लँडस्केप आणि शिल्पकला या प्रकारातील सुंदर पेंटिंग्स प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत.

## जिल्हा बँक कळस शाखेत महिला मेळावा उत्साहात संपन्न

- हळदी कुंकूच्या माध्यमातून बॅंकेच्या विविध योजनांची माहिती

**कळस : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कळस शाखेच्या माध्यमातून व शाखाधिकारी वैशाली देशमुख यांच्या संकल्पनेतून नुकताच कळस गावांमध्ये आजपर्यंत चे सर्वात मोठा हळदी कुंकू महिला मेळावा उत्साहात संपन्न झाला.यावेळी आत्ताच बॅकेचे अध्यक्ष चंद्रकांत घुले पाटील यांनी बॅकेच्या माध्यमातून सर्वात कमी व्याजदरात सोनेतारण कर्ज उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. तसेच नवनवीन योजना आणि महिला सक्षमीकरण करण्यासाठी बॅकेचे महत्व पटवुन देण्यासाठी शाखाधिकारी वैशाली देशमुख, रोखपाल स्नेहा वाकचौरे, लिपिक वृषाली वाकचौरे यांच्या पुढाकाराने



कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा सर्व महिलांना देण्यात आली.

यावेळी महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.ग्रामीण भागातील महिलांनी चुल आणि मुल या दोन गोष्टी बरोबरच एकत्र येऊन नारीशक्ती चा गजर केला पाहिजे.तसेच आपल्या कडील दोन रुपये कसे वाचतील आणि वाचलेले पैसे कशा पद्धतीने सेव्हिंग करून आर्थिक स्थिती बदललवली पाहिजे या दृष्टिकोनातून विचार मंथन यावेळी पार पडले..प्रथमच असा उपक्रम कळस मध्ये बॅकेच्या वतीने होत असताना शेकडो महिलांनी यात आपला सहभाग नोंदविला होता.विशेषत: यावेळी विविध खेळासाठी पारितोषिक वितरण करण्यात आले.आलेल्या महिलांना भेटवस्तू देखील देण्यात आल्या व अल्पोपहार देखील देण्यात आला. यावेळी महिलांच्या चेहर्यावर आनंद मावत नव्हता. यावेळी सर्व कार्यक्रमासाठी शाखाधिकारी वैशाली देशमुख, रोखपाल स्नेहा वाकचौरे, लिपिक वृषाली वाकचौरे, सोसायटी लिपिक योगिता सोनवणे, शिपाई पांडुरंग घोडके,कुमोद धांडे आदींनी कष्ट घेतले.या उपक्रमाबद्दल सर्व स्तरावरून शाखेचे कौतुक होत आहे.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/०६/२०२६ अकोले दि.२०/०१/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. ललिता भाऊराव भांगरे, रा. सांगवी,** ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांची मुलगी कु. दिपाली भाऊराव भांगरे हिचा जन्म दि. ०३/०५/२०२१ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र केळी रुम्हणवाडी** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **केळी रुम्हणवाडी,** ता. अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. ललिता भाऊराव भांगरे, रा. सांगवी,** ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांची मुलगी कु. दिपाली भाऊराव भांगरे हिचा जन्म दि. ०३/०५/२०२१ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र केळी रुम्हणवाडी** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **केळी रुम्हणवाडी,** ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २०/०१/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# माई आजींचा सुशीलामाईंचा वारसा पुढे नेण्याचा आ. काळेंचा निर्धार

## वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण

**कोपरगाव : (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव : स्व. सुशीलामाई काळे यांच्या संस्कारांनी आम्हाला माणुसकी, कर्तव्यनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाचे मोल शिकवले. त्या केवळ आमच्या कुटुंबाचा आधारस्तंभनव्हत्या, तर संपूर्ण काळे परिवाराच्या मूल्यांची दिशा ठरवणाऱ्या व्यक्तिमत्त्व होत्या. त्यामुळे त्यांनी दिलेल्या संस्कारांचा वारसा जपत शिक्षणसेवेचा वसा पुढे नेत आहोत, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचे अध्यक्ष, आमदार आशुतोष काळे यांनी केले. कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे कन्या विद्यामंदिर व कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात स्व. सुशीलामाई काळे यांच्या स्मृतीदिनी आयोजित रौप्य महोत्सवी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नाशिक विभागाच्या सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अश्विनी निकम उपस्थित होत्या. यावेळी आ. आशुतोष काळे म्हणाले की, "माझे आजोबा कर्मवीर शंकरराव काळे यांनी ग्रामीण भागातील सर्वसामान्य मुलांपर्यंत शिक्षण पोहोचावे, या ध्यासातून रयत शिक्षण संस्थेसाठी आयुष्यभर अविरत परिश्रम घेतले. त्या ध्येयपूर्तीसाठी सुशीलामाई आजींनी त्यांना सदैव खंबीर




साथ दिली. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी आग्रह धरून अनेक शाळा व महाविद्यालये सुरू करण्यास प्रवृत्त केले. त्यातून हजारो मुलींची आयुष्ये घडली."वक्तृत्व स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, "वक्तृत्व म्हणजे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, तर विचारांची ताकद आहे. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वैचारिक प्रगल्भता आणि समाजभान निर्माण होते. आजच्या पिढीने निर्भीड व मूल्याधिष्ठित विचार मांडावेत, ही समाजाची अपेक्षा आहे." प्रमुख अतिथी अश्विनी निकम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मराठी माध्यमांच्या शाळांचा गौरव केला. "एमपीएससी परीक्षेत यशस्वी होणारे बहुतांश विद्यार्थी ग्रामीण व मराठी माध्यमातील असतात. महिलांना जीवनात दुहेरी जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात, त्यामुळे विद्यार्थिनींनी कणखर बनले पाहिजे," असा सल्ला त्यांनी दिला. मोबाईलचा योग्य वापर, मैदानी खेळांचे महत्त्व, आत्मविश्वास आणि वेळेचे नियोजनावर त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुण चंद्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कचरू कोळपे, संभाजीराव काळे, माजी उपसभापती वाल्मीकराव कोळपे, सरपंच सुमनताई कोळपे यांच्यासह शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी के. बी. चांदगुडे यांनी प्रास्ताविक केले.

रोहिणी म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. तर प्राचार्या सुशीला थोरात यांनी आभार मानले.

# साईबनमध्ये हूरड्यामुळे खवय्यांची रोज गर्दी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



अहिल्यानगर येथील एमआयडीसी जवळील निसर्गाच्या सानिध्यातील असलेल्या साईबन कृषी पर्यटन केंद्रातनोव्हेबर महिन्यात हुरडा सुरु झाला असून असंख्य लोकांनी त्याचा आस्वाद घेतला. तर हुरडासाठी सध्या रोज गर्दी होत आहे तर सुट्टीच्या दिवशी बुकिंग फुल होत आहे अशी माहिती डॉ प्रकाश कांकरिया यांनी दिली.

डॉ. कांकरिया दांम्पत्याच्या दूरदृष्टी व अथक परिश्रमामुळे साईबनची निर्मिती झाली.जिथे अनेक शतके गवतही उगवले नाही अशा खडकाळ उजाड माळरानावर मोठया परिश्रमाने पाणी अडवा व जिरवा या तत्वाचा अवलंब करून १०० एकरवर वनराई उभी केली आहे साईबन कृषी पर्यटन केंद्राचा परिसरात सर्वत्र हिरवा झालेला असून मुलांना आकर्षित करणारी सर्व प्रकारची खेळणी व मनोरंजन करणारे प्राणी, आंब्याच्या झाडाखाली वन भोजनाचा सुखद आनंद घेण्यापूर्वी लुसलुशीत गरमागरम हुरडा,चटण्या,गुडीशेव,रेवडी गोड आंबट बोरे,उकडलेला मका कणीस ,पेरूच्या फोडी व उसाचा रस हे सर्व असलेल्या साईबनमध्ये हुरडा पार्टीची मजा म्हणजे अनोखा आनंद लोकांना मिळतो माळरानावर अवतरलेला संपूर्ण स्वर्गच आपल्या हाती आला कि काय असे वाटू लागते.

पोहण्याचा तलाव, रेनडान्स,पपेट शो आणि बैलगाडी हे एक विशेष आकर्षण आहे.डोनाल्ड डक,मिकी माउस व अलिबाबाची गुहा आणि उंच उंच टेकड्या,त्याच्या बाजूने जाणारया रेल्वे गाडीचा कर्कश आवाज आणि मोहित करणारे परिसरातील संगीत,जुन्या नव्या गाण्यांची रेलचेल हे सर्व आकर्षित काणारे आहेत.

नगर जिल्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक परिवार स्नेही मोठ्या संख्येने साईबनच्या हुरडा पार्टीसाठी येत आहेत. सुट्टीच्या दिवशी तर मोठी गर्दी असते त्यासाठी आधी बुकिंगची सोय उपलब्ध आहे तसेच हुरडा व जेवणासह वाजवी दराचे प्याकेज उपलब्ध आहे.



नगर येथील मच्छिंद्रनाथ देवस्थान,सर्जेपुराच्या वतीने मच्छिंद्रनाथ उत्सवानिमित्त नाथांची ग्राम दर्शन मिरवणूक मोठ्या उत्साहात वाद्याच्या गजरत संपन्न झाली.

## थोडक्यात बातम्या...




### भानुदास कोतकर नाव काढण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत असलेल्या नेप्ती उपबाजार समितीला दिलेले भानुदासजी एकनाथ कोतकर हे नाव काढण्याच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी सहा आठवड्यात करण्याचे आदेश औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विभा कंकणवाडी व हितेन वणेगावकर खंडपीठाने दिले आहेत. या प्रकरणी नगरसेवक अमोल येवले यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर ७ जानेवारीला सुनावणी देत खंडपीठाने वरील आदेश पारित केले आहेत. नगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नेप्ती उपबाजार समितीला १५ ऑगस्ट २०२४ रोजी भानुदास कोतकर यांचे नाव देण्याचा मोठा सोहळा पार पडला होता. या नामांतराच्या विरोधात २७ ऑगस्ट २०२४ रोजी अमोल येवले यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व राज्याचे सहकार आयुक्त यांच्याकडे तक्रारी अर्ज दाखल केले. या अर्जावर जिल्हा उपनिबंधकांनी १३ फेब्रुवारी २०२५ रोजी आदेश पारित करून ४ जून १९८७ च्या परिपत्रकानुसार बाजार समित्यांना राजकीय किंवा सामाजिक पुढाऱ्यांची नाव देता येत नाही. त्यामुळे सदरचे नाव काढुन टाकण्यात यावे, असे आदेश दिले होते. जिल्हा उपनिबंधकांचा हा आदेश पणन संचालकांनीही कायम ठेवला होता.मात्र याचिकाकर्ते येवले यांनी याबाबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करून सुध्दा राजकीय दबावापोटी सदरच्या आदेशाची अमलबजावणी होत नव्हती. त्यामुळे अमोल येवले यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर नुकतीच सुनावणी झाली असून भानुदासजी एकनाथ कोतकर हे नाव काढण्याच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी सहा आठवड्यात करण्याचे आदेश पारित केले आहेत. याचिकाकर्ते येवले यांच्या वतीने ॲड. सुधीर झांबरे यांनी बाजू मांडून युक्तिवाद केला.

### पद्मीनबाई तुमवाड यांचे निधन



नायगाव (स. गांवकरी) : पदमीनबाई दिगांबर तुमवाड रा सुजलेगाव ता नायगाव जि. नांदेड यांचे काल दि १९ जानेवारी सोमवार रोजी रात्री ११ ३० वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि २० जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता अंत्यसंस्कार सुजलेगाव ता. नायगांव जि.नांदेड येथे करण्यात आले. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्ष होते.त्यांच्या पच्छात मुली, मुले,सुना,नातवंड असा परिवार आहे. त्या प्रसिद्ध शाहीर दिगंबर तुमवाड सुजलेगावकर यांच्या पत्नी,सामाजिक कार्यकर्ते पी.एफ.सी संचालक दत्ता तुमवाड यांच्या भावजय होत्या.



### स्वारातीम विद्यापीठातील विद्यार्थ्यांची गुजरातमधील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठतील ११ विद्यार्थ्यांचा एक गट आणि तीन शैक्षणिक कर्मचारी 'अन्वेषण २०२५' या राष्ट्रीय संशोधन आणि नाविन्य स्पर्धेच्या पश्चिम विभाग फेरीसाठी आज सकाळी गुजरात रवाना झाले. सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर येथे १९ ते २१ जानेवारी दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. निवडलेल्या विद्यार्थ्यांमध्ये विशाल वाडेकर, आचल मुलगिर, सोफिया पठाण, अस्मिता इंगळे, गौतम दुर्गम, वैष्णवी मलवाड, वैष्णवी हेसे, गीतांजली अदाबे, स्वप्नील कांबळे, आदित्य मुदिराज आणि यश जंभुळकर यांचा समावेश आहे. विद्यार्थी संघाचे मार्गदर्शन प्रा. डॉ. एच. एस. फडेवार, शंकर हंबर्डे आणि प्रा. विद्या कापसे करीत आहेत. संपूर्ण मोहिमेचे नेतृत्व नाविन्य, इन्क्युबेशन आणि लिंकेजेसचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांच्याकडे आहे.विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, डीन डॉ. एम. के. पाटील आणि आय.क्यू.ए.सी.चे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. 'अन्वेषण' स्पर्धेचे स्वरूप भारतीय विद्यापीठ संघटनेने (एआययू) २००७ पासून सुरू केलेली ही प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती आणि नाविन्याची क्षमता विकसित करण्यासाठी आयोजित केली जाते. उत्कृष्ट संघांना रोख पारितोषिके, प्रमाणपत्रे आणि सुवर्णपदके प्रदान केली जातात. यावर्षी पश्चिम विभाग फेरी सरदार पटेल विद्यापीठात होत आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे हे तरुण संशोधक राष्ट्रीय मंचावर आपल्या प्रकल्प सादर करणार आहेत.

# माळी महासंघातर्फे नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

## माळी समाजातील नगरसेवकांनी त्यांच्या कार्याचा व कर्तुत्वाचा ठसा शहरात उमटवला आहे- योगेश फुलारी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



अहिल्यानगर शहरात माळी समाजाचे अकरा नगरसेवक निवडून आल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे.मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आले ही माळी समाजासाठी अभिमानास्पद बाब आहे.

सामाजिक प्रश्नांची जाण असल्याने माळी समाजातील नगरसेवकांनी अहिल्या नगर शहरात त्यांच्या कार्याचा व कर्तुत्वाचा ठसा उमटवला आहे. असे प्रतिपादन माळी महासंघाचे भिंगार शहराध्यक्ष योगेश फुलारी यांनी केले आहे.

माळी महासंघाच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवक बाळासाहेब बोराटे,दत्ता गाडळकर, धनंजय जाधव, पुष्पाताई बोरुडे,सौ. मंगला लोखंडे,सौ.सुजाताताई पडोळे, सौ.आशाताई डागवाले, सौ.सुनीता फुलसौंदर, सौ.वंदनाताई ताठे, सौ. रूपालीताई दातरंगे, सौ. अश्विनीताई लोंढे आदींचा निवासस्थानी जाऊन महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भुषण भुजबळ, जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने,विवेक फूलसौंदर,भिंगार शहराध्यक्ष योगेश फुलारी,जिल्हा महासचिव मनोज फुलसौंदर, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष संदीप दळवी,कर्मचारी आघाडी जिल्हाध्यक्ष तुषार फुलारी, युवक आघाडी जिल्हाध्यक्ष यश भांबरकर,जिल्हा सचिव गणेश धाडगे,ज्येष्ठ आघाडी जिल्हा उपाध्यक्ष रोहिदास हराळे,जेष्ठ आघाडी जिल्हा महासचिव गोविंद चाफे,शेतकरी आघाडी शहर अध्यक्ष गणेश फुलसौंदर, तालुका अध्यक्ष भगवान हजारे, उद्योजक आघाडी शहर अध्यक्ष दिनेश कापरे, उद्योजक आघाडी उप शहर अध्यक्ष अमोल रासकर,कापूरवाडीचे शिवाजी धाडगे,प्रशांत चौरे युवक आघाडी कार्याध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष मनोज भुजबळ,राहुल साबळे, कानिफनाथ जगताप कोषाध्यक्ष, मुकुंद पांढरे संघटक निखिल राऊत भिंगार शहर सचिव, ऋषिकेश भुजबळ भिंगार शहर सहसचिव,श्याम रासकर सहकार आघाडी संघटक,प्रवीण साळुंखे महासचिव,गणेश हराळे युवक आघाडी,कानिफनाथ गव्हाणे युवक आघाडी कार्यकारणी सदस्य,अक्षय गव्हाणे आदी उपस्थित होते.

# कंत्राटदारासह मॅनेजरला मारहाण करत जिवे मारण्याची धमकी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

कामावरून काढून टाकल्याच्या रागातून एका तरूणाने आपल्या चार साथीदारांसह कंपनीच्या गेटमध्ये घुसून कंत्राटदार आणि मॅनेजरला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत कोयत्याने हातपाय तोडून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना नागापूर एमआयडीसी भागात रविवारी (१८ जानेवारी) दुपारी तीनच्या सुमारास घडली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवनाथ अर्जुन उदमले (रा. हिवरेझरे, ता. अहिल्यानगर) व अनोळखी चार जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्यावसायिक निनाद श्रीहारी टीपुगडे (वय-३५, रा. नागापूर, एमआयडीसी) यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची नागापूर एमआयडीसीत सिध्दी फोर्ज प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे. नवनाथ उदमले याला कंपनीने कामावरून काढून टाकले होते. याच कारणाचा राग मनात धरून रविवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास संशयित आरोपीने आपल्या चार अनोळखी साथीदारांसह कंपनीचे गेट गाठले. कंपनीच्या आवारात बेकायदेशीर प्रवेश करून फिर्यादी निनाद टीपुगडे, कंत्राटदार सदाशिव कुलकर्णी आणि प्रोडक्शन मॅनेजर राजेंद्र जाधव यांना शिवीगाळ केली. वादाचे रूपांतर पुढे हाणामारीत झाले. आरोपींनी या तिघांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. नवनाथ उदमले याने सोबत आणलेल्या कोयत्याचा धाक दाखवत तुमचे हातपाय तोडून तुम्हाला जिवे ठार मारतो अशी धमकी दिली.

# गार्गी रुपेश चव्हाणला राष्ट्रीय स्पर्धेत सांघिक सुवर्ण पदक



अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

इंफाळ मणिपूर येथे सुरू असलेल्या १९ वर्ष शालेय राष्ट्रीय धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धेत अहिल्यानगर ची स्टार खेळाडू गार्गी रुपेश चव्हाण ने रिकर्व्ह राऊंड प्रकारात सांघिक कामगिरी करत सांघिक सुवर्ण पदक पटकावले आहे. अमरावती येथे डिसेंबर मध्ये झालेल्या शालेय राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेत गार्गी चव्हाण हिने १ कांस्य व १ रजत पदक मिळवले होते हि स्पर्धा क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,अंतर्गत उपसंचालक क्रीडा व युवक सेवा अमरावती विभाग,जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा कार्यालय तसेच महाराष्ट्र आर्चरी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धा संपन्न झाली होती त्यामुळे तिची निवड झाली होती. नगरची रहिवासी व सध्या इ.१२ वी मध्ये दादासाहेब घाडगे पाटील विद्यालय इथे शिक्षण घेत असलेली गार्गी चव्हाण हिने इंफाळ, मणिपूर राज्य येथे चालू असलेल्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता महाराष्ट्र संघात असून तिने रिकर्व्ह राऊंड प्रकारात सांघिक कामगिरी करत सांघिक सुवर्ण पदक पटकावले आहे. लहान पणापासून तिला क्रीडा क्षेत्राची आवड असून आजपर्यंत तिला अनेक राष्ट्रीय व राज्य स्तरावर पदके मिळवली असून राज्य मिनी ऑलंपिक मध्ये सुवर्ण पदक मिळवले आहे. तिला नगरचे अभिजित व शुभांगी दळवी याचे कडे प्रशिक्षण घेत आहे व त्यांचे मार्गदर्शन आहे.

# श्रीसमर्थ रामदास स्वामी पादुकांचे उत्साहपूर्ण वातावरणात शहरात आगमन

■ श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या जयघोषाने परिसर दुमदुमला

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



सज्जनगड येथील श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचे शहरातील दिल्लीगेटजवळ आगमन होताच उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. श्री समर्थ रामदासस्वामींच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. आ.संग्रामभेय्या जगताप, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी नगरसेवक अजय चितळे, समर्थभक्त सुनील रामदासी, ॲड. अच्युतराव पिंगळे, श्री समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश क्षीरसागर, उपाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, खजिनदार पुरूषोत्तम बेदरे, सचिव महेश कुलकर्णी, सदस्य रविंद्र कुलकर्णी, सुरेश त्र्यं.क्षीरसागर, मिलिंद जोशी, ॲड.सौ.अनघा भारदे, संजय विप्रदास, प्रदिप पतकी, ॲड.देवेंद्र बंब, वसंतराव कुलकर्णी, वेदमूर्ती प्रद्युम्न जोशी, मिलिंद चवंडके, अविनाश धर्माधिकारी, अनिल रामदासी, पुष्कर कुलकर्णी, माजी नगरसेवक अशोक दहिफळे, सौ.उज्वला भांगे, सौ.कालिंदी केसकर, सौ.संगीता रामदासी, सौ.माधवी कुलकर्णी, सौ.प्रतिभा ठिपसे, सौ.मिना गोयल आदींसह श्रीसमर्थ भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित सर्वांनीच एका सुरात श्रीरामरायांसह समर्थ रामदासस्वामींच्या नामाचा जयघोष केला. फुलांनी सुशोभित केलेल्या पालखीत समर्थांच्या पादुकांसह फोटो विराजमान करण्यात आल्या. सुवासिनींनी औक्षण केल्यानंतर पुष्पवृष्टी करत सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. विश्व हिंदू परिषदेच्या जिल्हा कार्यालयाजवळ विहिंपचे जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर आणि जिल्हा धर्माचार्य संपर्क प्रमुख मिलिंद चवंडके यांनी पादुकांना पुष्पहार घालून स्वागत करताना श्री समर्थांचे वंशज श्री. भूषण स्वामी यांनाही सन्मानित केले. यावेळी जिल्हा धार्मिक यात्रा संघ प्रमुख राजेंद्र चुंबळकर, मंदिर एवम् अर्चक पुरोहित आयामचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हा प्रमुख श्रीकांत नांदापूरकर उपस्थित होते.

श्री समर्थ मंडळाच्या पदाधिकारींसह सदस्यांनी समर्थांच्या पालखीचे भोई होण्यातील धन्यता अनुभवली. ठिकठिकाणी मिरवणुकीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. चौपाटी कारंजा चौकात जोरदार स्वागत करण्यात आले. पादुका ऋग्वेद भवनामध्ये आल्यानंतर सुशोभित सभागृहात स्थानापन्न करण्यात आल्या.

श्री समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश क्षीरसागर यांनी स्वागत करताना या सोहळ्यासाठी अनेकांचे हात लागले म्हणूनच हे भव्य-दिव्य स्वरूप आले असे सांगितले. सामाजिक कार्यकर्ते संतोष गेनाप्पा, अ.भा.देशस्थ ऋग्वेदी मंडळ मुंबईचे अध्यक्ष भैय्या गंधे, वेदमूर्ती किशोर जोशी यांना श्रीसमर्थांचे वंशज श्री. भूषण स्वामी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व मोत्यांची माळ देवून सन्मानित करण्यात आले.

श्रीसमर्थांचे वंशज श्री.भूषण स्वामी म्हणाले, श्रीसमर्थांच्या पादुका अहिल्यानगरला याव्या म्हणून सुनिलराव रामदासी आणि श्रीसमर्थ मंडळाने विशेष प्रयत्न केले. श्रीसमर्थांनी हे प्रयत्न पाहून होकार दिल्याने आज पादुका अहिल्यानगरीत आल्या.

श्रीसमर्थ येणार हे निश्चित होताच वास्तुतही बदल होतात, हे आपण सर्वजण पहात आहात. आपल्या सर्वांचे महाभाग्य इंग्रजी कालगणनेच्या पहिल्याच महिन्यात आपल्या भेटीस श्रीसमर्थ आले. मकर संक्रमणाचा पर्वकाळ सुरू आहे.

# नदीजोड प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी केंद्र सरकारने अर्थसहाय्य करावे

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य दुष्काळमुक्त करण्या करीता महायुती सरकारने सुरु केलेल्या नदीजोड प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी केंद्र सरकारने अर्थसहाय्य करावे अशी विनंती केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर पाटील यांना करण्यात आली.राज्यातील सिंचन प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्ली येथील कार्यालयात केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर पाटील यांच्या उपस्थितीत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री गिरीष महाजन, जलशक्ती विभागाचे केंद्रीय सचिव कांताराव, आयुक्त प्रविण कुमार, विभागाचे अप्पर मुख्य सचिव दिपक कपूर, सचिव डॉ.संजय बेलसरे यांच्यासह राज्याच्या सर्व पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक आणि वरिष्ठ आधिकारी उपस्थित होते. राज्यामध्ये सुरु असलेल्या सिंचन प्रकल्पांच्या कामाची माहीती केंद्रीय मंत्र्यांना देण्यात आली. या सुरु असलेल्या कामाबाबत त्यांनी समाधानही व्यक्त केले. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत राज्यातील २९ प्रकल्पांचा समावेश करण्यात आला असून, यामध्ये कोकण पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत ५, विदर्भ पाटबंधारे महामंडळा अंतर्गत ७, कृष्णा खोरे विकास महामंडळा अंतर्गत ९ आणि गोदावरी विकास महामंडळा अंतर्गत ४ तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत ४ प्रकल्पांची कामे सुरु असल्याचे केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.यापैकी कृष्णा व गोदावरी प्रकल्पा अंतर्गत सुरु असलेल्या १३ प्रकल्पांपैकी दहा प्रकल्प पुर्ण झाले असल्याची माहीती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत दिली.

बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत कृष्णा व गोदावरी महामंडळाच्या अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांच्या कामापैकी १५ प्रकल्प पुर्ण झाले आहेत. उर्वरित दोन प्रकल्प पुर्ण करण्याकरीता विभागाचे प्रयत्न असून, या दोन्हीही योजनांच्या अंतर्गत सुरु असलेल्या कामांची गती वाढवून ही कामे पुर्णत्वास जाण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही केंद्रीय मंत्री सी.आर पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात नदीजोड प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आले आहेत. यामध्ये प्राधान्याने दमणगंगा- एकदरे-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, कोकण गोदावरी खोरे, नळगंगा- वैनगंगा, पार गोदावरी या प्रकल्पांच्या कामासाठी अधिकच्या निधीची गरज असून, केंद्र सरकारने यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि गिरीष महाजन यांनी बैठकी दरम्यान केली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील निळवंडे २ प्रकल्पाचे काम पुर्ण होवून यामध्ये पाणीसाठाही होत आहे. डाव्या व उजव्या कालव्यांची कामेही पुर्ण होत आहे. प्रकल्पाच्या कालव्यांचे अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर असून, पाण्याची वितरण व्यवस्था बंदिस्त करण्याचे धोरण घेण्यात आले असून, यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून निधी उपलब्ध व्हावा अशीही मागणी या बैठकीत करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# दिवा रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील एकमेव तिकीटघर रात्री १२ पर्यत सुरु ठेवण्याची मागणी

## अनेक रेल्वे प्रवाश्यांच्या अध्यक्ष आदेश भगत यांच्याकडे तक्रारी

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिवा रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील कल्याण दिशेला असलेले एकमेव तिकीटघर रात्री ९ वाजता बंद होते ते दररोज रात्री १२ वाजेपर्यंत पर्यत सुरु ठेवण्याची मागणी दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष व नगरसेवक एडो. आदेश भगत यांनी संबंधित विभागीय रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. प्रकरणी अनेक रेल्वे प्रवाश्यांच्या संघटनेचे अध्यक्ष आदेश भगत यांच्याकडे तक्रारी आल्याने तसेच दिवा रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या झपाट्याने वाढत असून दिवा शहराची ९० टक्क्यांपेक्षा जास्त लोकवस्ती ही दिवा पूर्वेला आहे. यापूर्वी एकही तिकीट घर नसलेल्या दिवा स्थानकाच्या पूर्वेला तिकीटघर व्हावं याकरिता दिवा रेल्वे प्रवासी संघटनेने पाठपुरावा केला होता. खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने दिवा स्थानकाच्या पूर्वेला नवीन तिकीटघर झालं असून असंख्य रेल्वे प्रवाशांना त्याचा लाभ होत आहे. सध्या दिवा रेल्वे स्थानकात पूर्वेला एकमेव तिकीट घर असून ते कल्याण दिशेला आहे. सदर तिकीटघरावर प्रचंड ताण येत असून पादचारी पुलावर तिकीट व्हेन्डिंग मशीन ची अपुरी संख्या असल्यामुळे सर्व प्रवाशांना पूर्वेतील तिकीटघरावर अवलंबून राहाव लागत. दिवा रेल्वे स्थानकातील पूर्वेला असणारे तिकीटघर रात्री नऊ वाजता बंद होत असल्यामुळे रात्री नऊ नंतर प्रवाशांना तिकीट काढण्यासाठी पश्चिमेला जावं लागत. दिवा पश्चिमेला असणारे तिकीट घर हे मुंबई दिशेकडे असल्याने प्रवाशांना मोठी पायपिट करावी लागते. यामुळे रात्रीच्या वेळेस प्रवाशांना विशेषतः महिला प्रवाशांना याचा प्रचंड त्रास होतो. दिवा रेल्वे स्थानकात पूर्वेला असणारे तिकीटघर रात्री नऊ वाजल्यानंतर म्हणजेच रात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अँड आदेश कमलाकर भगत यांनी मध्य रेल्वेच्या विभागीय अधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे.






नांदेड :- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी वाराणसी येथे बांधलेल्या मनकर्णिका घाटा च्या उध्वंसा विरोधात काँग्रेसचा वतीने नियोजित अहिल्यादेवी होळकर स्मारक परिसरात निषेध आंदोलन करण्यात आले या आंदोलनात खासदार रवींद्र पाटील चव्हाण, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे आंदोलनाचे आयोजक विठ्ठल पावडे यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संवेदनशील युवा साहित्यिक सोनू दरेगावकर यांनी अभिनेत्री मीरा नांदेडकर यांचे मुलाखतीतून उलगडले भावविश्व !

■ शाळेचे दिवस आणि माझा संघर्ष मीरा नांदेडकरांच्या पुस्तकाचे थाटात प्रकाशन

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**




सुप्रसिद्ध अभिनेत्री मीरा नांदेडकर यांच्या आयुष्यातील विविध पैलू आणि भावविश्व आपल्या खुमदार शैलीतून संवेदनशील मनाचे कवी सोनू दरेगावकर यांनी मीरा नांदेडकर यांची त्यांनी घेतलेली मुलाखत संस्मरणीय अशी ठरली आहे.

शाळेचे दिवस आणि माझा संघर्ष या मीरा नांदेडकर लिखित पुस्तकाचे प्रकाशन आज महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत पार पडले. नीलम पब्लिकेशन मुंबई ने हे पुस्तक प्रकाशनासाठी सिद्ध केले होते.

यावेळी मीरा नांदेडकर यांची प्रकट मुलाखत सोनू दरेगावकर यांनी घेतली. या मुलाखतीतून मीरा नांदेडकर यांचा बालपणापासून ते अभिनेत्री पर्यंत प्रवास, या प्रवासादरम्यान आलेले खाचखळगे आणि निर्माण झालेल्या संघर्ष त्यातून काढलेल्या वाटा सोनू दरेगावकर यांच्या प्रश्नातून उपस्थितांना अनुभवत आल्या. प्रत्येक प्रश्न नवी अनुभूती देणारे होते. त्यामुळे मीरा नांदेडकर यांची आजची प्रकट मुलाखत आगळी वेगळी संस्मरणीय ठरली.

यावेळी, शिक्षक पांडुरंग काळे, अविनाश पाठक, सज्जन प्रभू, माधव मल्लेवार, नागोराव कल्याणकर, गाडीवान कामाजी, मगरे केरबा, साईनाथ चिद्रावार, श्रीमती ज्योती ढोणे, लेखिका रुपाली वागरे, विलास वाहूळे, नागाबाई शंकरराव नांदेडकर, शांता शौनक यांची उपस्थिती होती.

# २७वे सी. डी. देशमुख स्मृती सेमिनार यशस्वीपणे संपन्न

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे येथील नॅशनल इन्शुरन्स अकॅडमी (NIA) यांनी सोमवार, १९ जानेवारी २०२६ रोजी २७वे वार्षिक सी. डी. देशमुख स्मृती सेमिनार २०२६ यशस्वीपणे आयोजित केले. दिवसभर चाललेल्या या सेमिनारची संकल्पना होती – "I.M.P.A.C.T 2047 (Insurance Mobilization for Protection through Availability, Care and Trust) – विकसित भारत २०४७ साठी जीवन विमा समावेशनाचा विस्तार". या सेमिनारमध्ये देशभरातील विमा क्षेत्रातील वरिष्ठ उद्योग नेते, नियामक संस्था आणि व्यावसायिक एकत्र येऊन भारतातील विमा संरक्षण आणि विमा पोहोच अधिक मजबूत कशी करता येईल, यावर सखोल चर्चा करण्यात आली.

# सौ. दिपाली मोरे यांनी विजयाची केली हॅट्रीक

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**





मनपा निवडणूकीत भाजपा पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवुन प्रभाग क्रमांक 19 व 20 मधील नऊ ही उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी झाले असून यात मनपा क्षेत्रात सार्वधिक मते घेऊन सौ.निरजंना राजु लांडगे एकुण 11270 मते घेऊन विजयी होण्याचा मान मिळवला आहे,तर तिनं वेळेस सतत निवडुन येण्याचा बहुमान सौ.दिपाली संतोष मोरे यांना मिळाला असुन त्यांना 5267 मतांची आघाडी मिळाली आहे.

माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजपा पक्षाने स्वबळावर निवडणूक लढविली यात प्रभाग क्रमांक 19 व 20 मध्ये भाजपा पक्षाचे उमेदवार अनुक्रमे हे प्रचंड मताधिक्याने विजयी झाले असुन यात सौ.निरंजना राजु लांडगे यांनी 8001 मतांची आघाडी घेऊन तर सतत तिनं वेळेस हट्रीक विजयी होण्याचा मान वसरणी कौठा प्रभागातील सौ.दिपाली संतोष मोरे 5267 तर प्रभाग क्रमांक 20 मधील सर्व साधारण पुरुष गटातुन संजय घोगरे पाटील 6122 ,

महिला सर्वसाधारण गटातुन प्रथमच निवडणूक लढविलेल्या सौ.सुर्वणा सतीश पाटील बस्वदे 7838,वैजनाथ ईश्वरराव देशमुख 6288,विघमान नगरसेविका मंगला गजानन देशमुख 6790,व मनपा क्षेत्रातील सर्वाधिक मते घेऊन येण्याचा बहुमान सौ.निरजंना राजु लांडगे 8001मताची निर्णायक आघाडी मिळाली आहे.

प्रभाग क्रमांक 19 मधील सतत तिनं वेळेस निवडुन येण्याचा मान बहुमान विधमान नगरसेविका सौ.दिपाली संतोष मोरे यांना मिळाला असुन त्यांनी 5267मतांची आघाडी घेऊन विजय मिळवला तर माजी नगरसेवक अभिषेक सौदे हे 4009, तर सुलोचना धोंडीबा काकडे 3883, विघमान नगरसेवक राजू पाटील काळे यांच्या पत्नी सौ.अनुराधा राजु पाटील काळे 4392, ह्या प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्या आहेत.

विजयी झाल्यानंतर दोन्ही प्रभागातील नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांनी प्रत्येक विभागातील विविध भागात जाऊन मतदार बंधु भगिनीचे आभार मानले असुन माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, खासदार अजितराव गोपछेडे,भाजपाचे महानगर अध्यक्षमाजी आमदार अमरभाऊ राजूरकर यांच्यी प्रत्यक्ष भेट घेऊन सत्कार केला असुन मार्गदर्शन ही घेतले आहे,तर पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भेट घेतली आहे.

माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली एकतर्फी मोठया प्रमाणात नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील या भागात भाजपा पक्षाचे नऊ उमेदवार निवडून आले असुन धवधवीत यश संपादन केले आहे.

# जल्लोषात शंभर वर्षीय सासुने घेतला सहभाग

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**



नांदेड महानगरपालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर प्रभाग क्र. १९ मधून भाजपाच्या सुलोचना धोंडीबा काकडे यांचा प्रचंड मताधिक्याने विजय झाल्या नंतर विजयाचा आनंदोत्सव प्रभागात व निवासस्थानी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, काकडे कुटूंबाकडूनही फटाक्यांची आतिषबाजी करत मिठाई वाटप करण्यात आली. यावेळी विजयी उमेदवार सुलोचना धोडीबाराव काकडे यांच्या शंभर वर्षीय सासू कौठ्याच्या माजी सरपंच पंचफुलाबाई नरोजी काकडे यांनी सुनेच्या आनंदोत्सावात सहभाग घेत, पेढे भरून कौतुक करत आर्शीवादाची थाप दिली.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेच्यी निवडणुक तब्बल आठ वर्षांनंतर 15 जानेवारी 26 रोजी झाल्यानंतर 16 जानेवारी रोजी निकाल झाल्यानंतर आनंदोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला कार्यकर्ते यांच्याकडून गुलालाची उधळण करत मिठाई वाटप करून ढोल-ताशांच्या गजरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला यावेळी प्रभाग क्र. १९ मधील भाजपच्ये चारही उमेदवार विजयी झाले यात सुलोचनाबाई धोंडीबा राव काकडे ह्या विजयी झाल्या,कौठा भागातील कुटूंबाचा राजकारणात दबदबा आहे. सरपंच,नगरसेवक,जिल्हा परिषदेच्या राजकारणात काकडे कुटूंबाने आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे, नेहमीच समाज कार्यात सक्रीय असणाऱ्या काकडे परिवाराच्या मेहनतीमुळे नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत विजयाचा गुलाल उधळला गेला आहे. सुलोचना काकडे यांच्या विजयानिमित्त काकडे परिवाराकडून अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी कौठ्याच्या माजी सरपंच १०० वर्षे असलेल्या पंचफुलाबाई नरोजी काकडे यांचा सहभाग लक्षणीय दिसून आला. यावेळी वैशाली काकडे, सुरेखा काकडे, कविता काकडे, अंबिका काकडे, काबरा, संजीवनी काकडे, कांताबाई काकडे, मंजुळाबाई काकडे, राधाबाई काकडे यांच्यासह असरजन येथील राज्यपाल पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील खंडेराव बकाल यांच्या सह परिवारातील सदस्य उपस्थिती होती.

# लेखनावर साहित्यसंवाद साधावा

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**

साहित्यिकांनी स्वस्तुतीपेक्षा स्वलेखनापेक्षा इतरांच्या निर्मितीवर अभ्यासू जाणिवेने सकारात्मक दृष्टीकोण ठेवून साहित्यसंवाद साधावा अशी अपेक्षा दुर्गापूर येथील शब्दस्नेही साहित्य व्यासपीठाचे संस्थापक कवी यशवंत पुलाटे यांनी व्यक्त केली. श्रीरामपूर येथील वाचन संस्कृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित साहित्य संवादात ते बोलत होते. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी स्वागत केले. कवी यशवंत पुलाटे यांच्या साहित्यसेवेचा आणि शैक्षणिक सेवानिवृत्तीबद्दल शाल, भेटवस्तू, पुस्तके देऊन डॉ. उपाध्ये यांनी त्यांचा सत्कार केला तर सौ. उषाताई पुलाटे यांचा सत्कार कोषाध्यक्षा सौ मंदाकिनी उपाध्ये यांनी केला. कवयित्री संगीता फासाटे यांनी कवी यशवंत पुलाटे यांच्या 'जन्मझुला' कवितासंग्रहाचे काव्यमूल्य सांगितले.

# यादववाडी येथे शेतकऱ्याचे आमरण उपोषण

■ खडी क्रेशरच्या धुळीने आरोग्य आणि शेती उद्ध्वस्त; प्रशासनाकडून दुर्लक्ष

परिसरातील खडी क्रेशर आणि खाणींमधून निघणाऱ्या धुळीने आमचे शेत, फळपिके आणि आरोग्य पूर्णपणे धोक्यात आले आहे. श्वसनाचे आजार, पाण्याची टंचाई निर्माण झाले आहेत प्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या निवेदनांकडे दुर्लक्ष केले. आता आमरण उपोषणाशिवाय दुसरा पर्याय उरला नाही. प्रदूषण थांबवले नाही तर आमचे जीवनच धोक्यात आहे.

**- साहेबराव शेळके (उपोषणकर्ते, यादववाडी)**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील यादववाडी गावातील शेतकरी साहेबराव नामदेव शेळके यांनी खडी क्रेशरमुळे होणाऱ्या प्रदूषणाला कंटाळून सोमवार, १९ जानेवारी २०२६ पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. प्रशासनाने याबाबत कोणतीही दखल न घेतल्याने त्यांना हे पाऊल उचलावे लागले.

यादववाडी परिसरात तीन मोठ्या खडी क्रेशर आणि खाणी कार्यरत आहेत. या खाणींमधून निघणाऱ्या प्रचंड धुळीमुळे साहेबराव शेळके यांच्या गट क्रमांक २७७ मधील राहत्या घरात आणि गट क्रमांक ३०४ मधील फळपिकांवर मोठा परिणाम झाला आहे. पिके पूर्णपणे धोक्यात आली असून, घरातील सदस्यांना श्वसनाचे गंभीर विकार जडले आहेत. खाणींमधील स्फोटांमुळे बोअरचे पाणी बंद पडले असून, पिण्याच्या पाण्याची तीव्र समस्या निर्माण झाली आहे.

शेळके यांनी यापूर्वी शासन, प्रशासन आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वेळोवेळी लेखी निवेदने दिली आणि पाठपुरावा केला. मात्र, कोणतीही कारवाई झाली नाही. खाण मालकांकडून अरेरावीची भाषा वापरली जाते, तर ग्रामपंचायतीकडूनही दुर्लक्ष केले जाते. या सर्व गोष्टींमुळे कंटाळून त्यांनी सकाळी १० वाजता उपोषणास सुरुवात केली. उपोषण सुरू असून, प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन खडी क्रेशर बंद करावेत आणि प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

शेळके यांच्या या आंदोलनामुळे स्थानिक परिसरात चिंता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने लवकरात लवकर या समस्येवर तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# श्री सत्यगणपती दाभड येथे विविध कार्यक्रम

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

गणेश जयंती निमित्ताने सत्यगणपती देवस्थान दाभड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन दि.२२ जानेवारी गुरुवारी रोजी करण्यात आले आहे. गणेश जयंतीनिमित्त होणाऱ्या महाप्रसादाचा लाभघ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. नांदेड अर्धापूर रस्त्यावरील दाभड (भोकरफाटा) परिसरातील सत्य गणपती देवस्थान एक जागृत देवस्थान म्हणून मराठवाड्यात प्रसिद्ध आहे येथील गणपतीचे दर्शन घेण्यासाठी दर महिन्याच्या संकष्ट चतुर्थीला गणेश भक्तांची खूप मोठी गर्दी होत असते. सन १९९३ साली गणेश जयंतीच्या मुहूर्तावर ष.ब्र श्री गुरु शिध्दलिंग शिवाचार्य स्वामी (वेदांताचार्य) साखरखेर्डा, जिल्हा बुलढाना यांच्या हस्ते "श्री सत्य गणपती" मुर्ती प्राण प्रतिष्ठा व



कलशारोहन करण्यात आले होते. तेंव्हापासून प्रतिवर्षा प्रमाणे या ही वर्षी गुरूवार दि.२२ जानेवारी रोजी गणेश जयंतीच्या मुहूर्तावर श्री सत्य गणपती मुर्तीला अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तन महाभिषेक करण्यात येतो जयंती निमित्त येथे भाविकांची मोठी गर्दी होत असते. जयंती निमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात गणेश भक्तांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे तसेच ज्यांना महाप्रसादासाठी दान करावयाचे असल्यास मंदिरातील दानपेटीत टाकावे असे आवाहन संस्थानाचे प्रशासक तथा तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांनी केले आहे.

# मॉडर्न ज्युनियर कॉलेजच्या विशेष हिवाळी शिबिराचा समारोप

**राजूर : (समर्थ गांवकरी)**




हिंद सेवा मंडळ अहिल्यानगर संचलित मॉडर्न हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्टस ,सोमचंद शहा कॉमर्स व भास्करराव कदम गुरुजी सायन्स अकोलेच्या राष्ट्रीय सेवा योजना ( NSS +2 स्तर )विशेष हिवाळी शिबिराचा मौजे शेरणखेल ता. अकोले,जि. अहिल्यानगर येथे नुकताच समारोप संपन्न झाला.

या प्रसंगी मॉडर्न हायस्कूलचे माजी प्राचार्य एस.पी. देशमुख यांनी अध्यक्षपद भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून मॉडर्न हायस्कूलचे चेअरमन मोरेश्वर धर्माधिकारी, हिंद सेवा मंडळाचे कार्यकारणी सदस्य दिलीप भाई शहा शेरणखेल गावचे सुपुत्र आदर्श शिक्षक भाऊसाहेब कासार,जि. प. शाळेचे मुख्याध्यापक श्री.वायाळ सर,भाऊसाहेब कासार, रामचंद्र कासार, विनोद हांडे,प्रकाश कासार,माजी उपसरपंच व इतर ग्रामस्थ, जुनिअर कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .

आदर्श शिक्षक भाऊसाहेब कासार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.अध्यक्षसूचन प्रा .बबन कासार व अनुमोदन प्रकाश कासार यांनी केले . शिबीरा दरम्यानचे अनुभव चि . सार्थक भांगरे , अजय वाघमारे, कावेरी कासार यांनी व्यक्त केले .

या शिबीरातील निरीक्षणातून कु . डावरे ज्ञानेश्वरी, चि गणेश गोसावी यांची आदर्श स्वंयसेवक म्हणून निवड करण्यात आली . त्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला .

"अशा हिवाळी शिबीरांतून वियार्थ्यांच्या अंगी स्वंयशिस्त व श्रमसंस्कार रुजतात व आयुष्यात कठीण प्रसंगांना सामोरे जाण्याचे मनोधैर्य निर्माण होते" असे मत श्री मोरेश्वर धर्माधिकारी यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले ."विद्यार्थ्यामध्ये श्रमप्रतिष्ठा नेतृत्वगुण, समाजशिलता, हे गुण वाढीस लागून आदर्श नागरीक घडतात व देशाला सर्वोच्य उंचीवर ते घेऊन जातात" असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष एस.पी.देशमुख यांनी केले. तर सात दिवसांतील केलेल्या कामाचे व नियोजनाचे कौतुक करत उपप्राचार्य दीपक जोंधळे यांनी कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन आपल्या जुनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांबद्दल व कर्मचाऱ्यांबद्दलचा अभिमान आपल्या मनोगतातून व्यक्त केला. याप्रसंगी भाऊसाहेब कासार,विनोद हांडे यांनीही आपली मनोगते व्यक्त करून मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा .संपत वाळके सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कोल्हे एम. जी, प्रा .केदार भिंगारदिवे, प्रा .नगरकर सर यांचे व सर्व स्वयंसेवकांचे मनापासून कौतुक केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश कोकणे यांनी केले तर श्री. वायाळ सर यांनी आभार प्रदर्शन करून समारोप कार्यक्रमाची सांगता झाली.

# टाटा मोटर्सकडून १७ नेक्स्ट-जनरेशन ट्रक्स लाँच

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**




भारतातील ट्रकिंग क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक व गतीशीलता सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आज आपल्या 17 ट्रक्सचा नेक्स्ट-जनरेशन पोर्टफोलिओ लाँच केला. हे ट्रक्स 7 टन ते 55 टन कन्फिग्युरेशन्समध्ये उपलब्ध आहेत. यासह सुरक्षितता, नफा व प्रगतीमध्ये नवीन मापदंड स्थापित केले आहे. या सर्वसमावेशक लाँचमध्ये ऑल-न्यू अझुरा सिरीज, अत्याधुनिक टाटा Trucks.ev श्रेणी आणि प्रस्थापित प्राइमा, सिग्ना व अल्ट्रा प्लॅटफॉर्म्समधील मोठ्या अपग्रेड्सचा समावेश आहे. जागतिक सुरक्षितता मानकांचे (ECE R29 03) काटेकोरपणे पालन करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे ट्रक्स उत्पन्न क्षमता वाढवतात, एकूण मालकीहक्क खर्च कमी करतात आणि वेईकल अपटाइम वाढवतात, ज्यामुळे वाहतूकदारांना मोठे यश मिळते.

नवीन ट्रक्स लाँच करत टाटा मोटर्स लि.चे एमडी व सीईओ श्री. गिरीश वाघ म्हणाले, “भारतातील ट्रकिंग क्षेत्रात झपाट्याने परिवर्तन होत आहे, ज्याला प्रगतीशील राष्ट्रीय धोरणे, आधुनिक पायाभूत सुविधा आणि सुरक्षित, अधिक स्वच्छ व अधिक कार्यक्षम लॉजिस्टिक्ससाठी वाढत्या मागणीने गती दिली आहे. टाटा मोटर्स मापदंड स्थापित करण्यामध्ये नेहमी अग्रस्थानी आहे, जे उद्योगाच्या भविष्याला आकार देतात. लाँच करण्यात आलेल्या आमच्या नेक्स्ट-जनरेशन पोर्टफोलिओमध्ये ऑल-न्यू अझुरा सिरीज, दोन प्रगत उच्च-कार्यक्षम पॉवरट्रेन्स, आमच्या नवीन आय-एमओईव्ही आर्किटेक्चरवर आधारित भारतातील शून्य-उत्सर्जन इलेक्ट्रिक ट्रक्स व ट्रिपर्सची व्यापक श्रेणी, युरोपियन मानक केबिन्स व उद्योग-अग्रणी सुरक्षितता वैशिष्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अपग्रेड्स, अधिक पेलोड क्षमता आणि इंधन कार्यक्षमतेचा समावेश आहे, जे सर्व फ्लीट एज डिजिटल सेवांसह एकीकृत करण्यात आले आहेत.

यासह आम्ही या वारशाला अधिक पुढे नेत आहोत. ‘बेटर ऑल्वेज तत्त्वामधून प्रेरित आमची नाविन्यतेप्रती अविरत मोहिम, स्थानिकीकरणाप्रती दृढ कटिबद्धता आणि ग्राहकांना यशस्वी करण्यावरील निरंतर फोकस ‘आत्मनिर्भर भारतच्या दृष्टिकोनाशी संलग्न आहेत, ज्यामुळे शाश्वत गतीशीलतेमध्ये नेतृत्व करण्याप्रती भारताचा आत्मनिर्भरपणा व महत्त्वाकांक्षा अधिक दृढ झाली आहे.

टाटा मोटर्सने ऑल-न्यू अझुरा श्रेणीला प्रदर्शित केले. ही श्रेणी इंटरमीजिएट व लाइट कमर्शियल वेईकल विभागात उच्च दर्जाची कार्यक्षमता, आरामदायीपणा आणि अपटाइम देण्यासाठी उद्देशासह डिझाइन करण्यात आली आहे.

उत्पादकता, सुरक्षितता व आरामदायीपणाला चालना देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या अझुरामध्ये आकर्षकतेसह उद्देशपूर्ण वैशिष्ट्यांचा समावेश आहे, ज्यामुळे ड्रायव्हिंग करताना थकवा न येता उत्साहवर्धक अनुभव मिळतो.

# मोठ्या पडद्यावर ‘सुड शकारंभ’ची ठसठशीत छाप

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



सत्तेच्या संघर्षातून जन्माला आलेली आणि सूडाच्या आगीत आकार घेतलेली कहाणी आता प्रेक्षकांसमोर अखेर उलगडली आहे. ज्योती पाटील प्रस्तुत आणि राजनील फिल्म प्रोडक्शन निर्मित मराठी ॲक्शन-ड्रामा-थ्रिलर ‘सुड शकारंभ’ हा सिनेमा १६ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्रभर प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांकडून या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ग्रामीण राजकारणाचं भयावह प्रतिबिंब आणि मानवी स्वभावातील बदल प्रभावीपणे मांडल्यामुळे, हा चित्रपट प्रदर्शित होताच प्रेक्षकांमध्ये त्याची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू झाली आहे. सध्या महाराष्ट्रभरच्या चित्रपटगृहात हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असून, सिनेरसिकांकडून सकारात्मक प्रतिक्रिया मिळत आहेत. प्रेक्षकांच्या मते “या चित्रपटाची संकल्पना खूपच वेगळी आणि आजच्या काळाशी भिडणारी आहे. नव्या पिढीला विशेषतः आकर्षित करणारा विषय आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत रहस्य आणि थराराने भरलेली कथा कुठेही सैल होत नाही. सिनेमाचा शेवट इतका धक्कादायक आहे की तो अक्षरशः मन हादरवतो. ‘सुड शकारंभ’ हा अनुभव मोठ्या पडद्यावरच घ्यायला हवा प्रत्येकाने थिएटरमध्ये जाऊन हा सिनेमा पाहायलाच हवा.” इतकच नव्हे तर चित्रपटाच्या प्रदर्शनादरम्यान झालेल्या एका विशेष स्क्रीनिंगला ‘सुड शकारंभ’च्या कलाकारांसह संपूर्ण टीमही उपस्थित होती. या वेळी प्रेक्षकांशी थेट संवाद साधत त्यांनी चित्रपटामागील प्रवास, अनुभव आणि भावना मोकळेपणाने शेअर केल्या. प्रेक्षकांकडून मिळणारा चांगला प्रतिसाद पाहून निर्माते आणि टीम भावूक झाली होती. महाराष्ट्राच्या विविध भागांतील कलाकारांना एकत्र घेऊन असा प्रभावी सिनेअनुभव घडवता आला, याचा त्यांना विशेष आनंद असल्याचं त्यांनी नमूद केलं. चित्रपटाला मिळणाऱ्या प्रेमामागे संपूर्ण टीमची मेहनत, समर्पण आणि एकजूट कारणीभूत असल्याचं सांगत, या यशात प्रत्येक सहकाऱ्याचा वाटा अमूल्य असल्याचं त्यांनी आवर्जून अधोरेखित केलं.

# सूर्यदयो स्मॉल फायनान्स बँकेचा गोल्ड लोन व्यवसायात प्रवेश

- **सुरक्षित कर्जवाढ धोरणाअंतर्गत देशभर टप्प्याटप्प्याने विस्तार**

**(समर्थ गांवकरी)**



सूर्यदयो स्मॉल फायनान्स बँक (SSFB), भारतातील एक अग्रगण्य न्यू-एज डिजिटल बँक, यांनी सुरक्षित कर्जवाढीच्या व्यापक धोरणाचा भाग म्हणून “गोल्ड लोन” विभागात प्रवेश केल्याची घोषणा केली आहे. या सेवेची सुरुवात महाराष्ट्रातून करण्यात आली असून, येत्या काही महिन्यांत इतर राज्यांमध्ये टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात येणार आहे।

गोल्ड लोन बाजारात प्रवेश करणे हे सूर्यदयो स्मॉल फायनान्स बँकेच्या विविध, पूर्ण-सेवा रिटेल बँक म्हणून होत असलेल्या सातत्यपूर्ण परिवर्तनाचे द्योतक आहे, ज्यामध्ये संतुलित आणि सुरक्षित मालमत्ता मिश्रणावर भर देण्यात आला आहे. हा निर्णय बँकेच्या अधिक सुरक्षित, तारण-आधारित आणि सूक्ष्म कर्ज पोर्टफोलिओ उभारण्याच्या धोरणाशी सुसंगत आहे, ज्यामुळे विद्यमान तसेच नव्या ग्राहकांच्या बदलत्या कर्ज गरजा पूर्ण करता येतील. गोल्ड लोनमध्ये प्रवेश हा बँकेच्या प्रवासातील एक स्वाभाविक आणि धोरणात्मक टप्पा आहे. गेल्या अनेक वर्षांत SSFB ने अनसिक्योर्ड व्यवसाय कर्जामध्ये मजबूत पाया घातला आहे, विशेषतः महिला उद्योजकांना पाठबळ देत त्यांना व्यवसाय सुरू करण्यास, वाढविण्यास आणि टिकवून ठेवण्यास मदत केली आहे. या व्यवसायांच्या वाढीसोबतच त्यांच्या कार्यभांडवलाच्या गरजाही वाढल्या आहेत. अनेक दीर्घकालीन ग्राहकांनी बँकेकडे विश्वासार्ह आणि पारदर्शक गोल्ड लोन सोल्यूशनची मागणी केली होती. ग्राहकांची मागणी, नातेसंबंधांवर आधारित बँकिंग आणि स्थानिक उद्योजक परिसंस्थेची सखोल समज यामुळे हा टप्पा एक नैसर्गिक पुढाकार ठरतो।

15 पेक्षा अधिक राज्यांमध्ये 700 हून अधिक बँकिंग आउटलेट्सच्या उपस्थितीसह, SSFB आपल्या वितरण क्षमतेचा, ग्राहक संबंधांचा आणि डिजिटल अंडररायटिंग क्षमतेचा उपयोग करून गोल्ड लोन व्यवसायाचा नियंत्रित आणि टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यासाठी सज्ज आहे.




## विशेष एसुस लॅपटॉप ऑफर्ससह प्रजासत्ताक दिन करा साजरा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

तैवानी तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी एसुस, आपल्या लॅपटॉपच्या विस्तृत श्रेणीवर आकर्षक ऑफर्स देऊन भारताच्या प्रजासत्ताक दिनाचा उत्साह साजरा करत आहे. प्रजासत्ताक दिनाच्या सेलचा एक भाग म्हणून, ग्राहक उच्च-कार्यक्षमतेच्या गेमिंग मशीनपासून ते आकर्षक आणि हलक्याफुलक्या उत्पादकता उपकरणांपर्यंतच्या अत्याधुनिक एसुस लॅपटॉपसह आपला डिजिटल अनुभव उन्नत करू शकतात.

# देशभरातील गुंतवणूकदारांकरिता खास अभियानाला प्रारंभ

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



फ्रँकलिन टेम्पलटन (इंडिया) ने 'चेंज द सोच - कन्याकुमारी टू काश्मीर ड्राइव्ह' या आपल्या देशव्यापी मोहिमेला आज हिरवा झेंडा दाखवला. सर्वसामान्यांमध्ये विशेषतः महिलांमध्ये आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी सरु करण्यात आलेले हे अशा प्रकारचे पहिले अभियान आहे. भारतात फ्रँकलिन टेम्पलटनच्या वाटचालीला ३० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल ही ३० दिवसांची मोहिम देशाचे दक्षिण टोक असलेल्या कन्याकुमारीपासून सुरू होईल आणि देशातील २१ शहरांमधून प्रवास करत जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगरमध्ये तिची सांगता होईल. उपस्थितांशी संवाद साधणारी आर्थिक शिक्षण सत्रे, तज्ञांचे मार्गदर्शन आणि सामुदायिक सहभाग या आधारे म्युच्युअल फंड गुंतवणुकीचे रहस्य दूर करणे, त्याचबरोबर आपल्या आर्थिक भविष्याची जबाबदारी स्वीकारण्यासाठी हजारो भारतीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. देशभरात आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देणाऱ्या या मोहिमेचे नेतृत्व फ्रँकलिन टेम्पलटन इंडियाचे अध्यक्ष अविनाश सातवळेकर हे करणार आहेत. या मोहिमेदरम्यान ते दर दोन दिवसाला विविध शहरांतील किंवा गावातील महिला गटांबरोबर गुंतवणूकदार शिक्षण कार्यशाळेतून संवाद साधणार आहेत. या कार्यशाळेत जीवनातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बचत, गुंतवणूक आणि दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याचे महत्त्व हे मुद्दे या महिला गटांसमोर स्पष्ट केले जाणार आहेत. या उपक्रमात विविध क्षेत्रातील घटकांना सहभागी करुन घेतले जाणार आहे. विशेषतः विविध क्षेत्रातील महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात राहणार आहे. यामध्ये शेतकरी (मासेमारी समुदाय ते पीकांच्या लागवडीमध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिला), शैक्षणिक क्षेत्र (विद्यार्थीनी, माता, शाळा आणि विद्यापीठातील शिक्षिका), बचत गट (अन्न आणि हातमाग क्षेत्रात कार्यरत महिला), उद्योजक, खासगी आणि सरकारी क्षेत्रातील महिला कर्मचारी त्याचबरोबर सैन्य, नौदल आणि पोलिस कर्मचारी या क्षेत्रातील महिलांचा समावेश राहणार आहे.

या उपक्रमाविषयी बोलताना फ्रँकलिन टेम्पलटन-इंडियाचे अध्यक्ष अविनाश सातवळेकर म्हणाले, "भारताच्या दीर्घकालीन सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी महिलांमध्ये आर्थिक साक्षरता हा अतिशय मूलभूत आणि महत्वाचा घटक राहणार आहे.

# आगामी केंद्रीय अर्थसंकल्पासाठी AMCCIE कडून विविध मागण्या

**पुणे : (समर्थ गांवकरी)**







आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (AMCCIE) यांनी देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी व माननीय केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना पूर्व-अर्थसंकल्पीय मागण्यांचे सविस्तर पत्र सादर केले आहे. या पत्रात एमएसएमई, व्यापारी वर्ग, जीएसटी सुधारणा, शिक्षण, उत्पादन क्षेत्र, स्टार्टअप्स, रिअल इस्टेट, रत्न व आभूषण उद्योग तसेच रोजगारनिर्मिती या प्रमुख मुद्द्यांवर ठोस मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

AMCCIE च्या वतीने बोलताना श्री राजेश अग्रवाल, राष्ट्रीय अध्यक्ष, AMCCIE यांनी सांगितले की, येणारा अर्थसंकल्प विकासाभिमुख, व्यापारी-हितैषी आणि किमान अनुपालनाचा असावा. अशा धोरणांमुळे “विकसित भारत” या राष्ट्रीय संकल्पनेला बळ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या मागण्यांना AMCCIE चे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री नरेंद्र गोयल, संचालक श्री कमलराज बन्सल, संचालक श्री उमेश मंडोत तसेच चेंबरचे सर्व संचालक व सदस्य यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

AMCCIE च्या प्रमुख अर्थसंकल्पीय मागण्या

जीएसटी प्रणाली केवळ 0%, 5% आणि 10% अशा तीन स्लॅबमध्ये मर्यादित ठेवावी व 18% आणि 28% स्लॅब रद्द करावेत. लघु व्यापाऱ्यांसाठी त्रैमासिक जीएसटी रिटर्न आणि जलद रिफंड प्रणाली लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती व निर्यातीत योगदान देणाऱ्या या उद्योगासाठी जीएसटी दर फक्त 1% ठेवावा, अनुपालन प्रक्रिया सुलभ करावी आणि निर्यातस्नेही धोरणे राबवावीत, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

₹5 कोटींपर्यंत हमीविना कर्ज, व्याज अनुदान, एमएसएमई टर्नओव्हर मर्यादा वाढवणे आणि अनुपालनाचा भार कमी करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

मॅन्युफॅक्चरिंग व ‘मेक इन इंडिया’ : पारंपरिक उद्योगांना PLI योजनांमध्ये समाविष्ट करणे, वीजदर कमी करणे, तांत्रिक उन्नतीसाठी भांडवली अनुदान आणि सिंगल विंडो क्लिअरन्स प्रणाली लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

कमी व्याजदरातील शैक्षणिक कर्ज, कौशल्य विकासासाठी करसवलती तसेच खाजगी व सामुदायिक शिक्षण संस्थांना शासकीय पाठबळ देण्यावर भर देण्यात आला आहे.

स्टार्टअप इंडिया अंतर्गत करसवलतीचा कालावधी 10 वर्षांपर्यंत वाढवणे, एंजेल टॅक्स पूर्णपणे रद्द करणे आणि टियर-2 व टियर-3 शहरांतील स्टार्टअप्ससाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

L&T Finance


## एलअँडटी फायनान्स लि. च्या नफ्यामध्ये ७६० कोटी रूपयांची वाढ

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एलअँडटी फायनान्स लि. (पूर्वीची एलअँडटी फायनान्स होल्डिंग्ज लि.) या भारतातील आघाडीच्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीने (एनबीएफसी) 31 डिसेंबर 2025 रोजी समाप्त झालेल्या तिसऱ्या तिमाहीत (आर्थिक वर्ष 26 ची तिसरी तिमाही) करोत्तर नफ्यामध्ये (पीएटी) 760 कोटी रूपयांच्या आतापर्यंतच्या सर्वोच्च वाढीची नोंद केली (नवीन कामगार संहिता तरतुदीच्या एक वेळच्या परिणामापूर्वी), ज्यामध्ये वार्षिक 21 टक्क्यांची वाढ झाली. नवीन कामगार संहिताच्या एक वेळच्या परिणामानंतर पीएटी आर्थिक वर्ष 26 च्या तिसऱ्या तिमाहीत 18 टक्के वाढीसह 739 कोटी रूपयांपर्यंत पोहोचला.

# रुकम कॅपिटल स्टडी - बियॉन्ड मेट्रोज

**(समर्थ गांवकरी)**




भारतातील उपभोग-नेतृत्वाखालील वाढ आता मोठ्या महानगरांपुरती मर्यादित राहिलेली नाही. मागणी, उद्योजकता आणि दीर्घकालीन आर्थिक गती टियर 2 आणि टियर 3 शहरे, उदयोन्मुख शहरे आणि लहान शहरांमध्येही वाढत आहे. सुरुवातीच्या टप्प्यातील ग्राहक ब्रँडना समर्थन देणारी व्हेंचर कॅपिटल फर्म रुकम कॅपिटलने त्यांचा नवीनतम संशोधन अहवाल "बियॉन्ड मेट्रो: द रिअल स्टोरी ऑफ इंडियाज नेक्स्ट 500 मिलियन" प्रकाशित केला आहे, जो मेट्रो नसलेले ग्राहक ब्रँड कसे शोधतात, त्यावर विश्वास ठेवतात आणि खरेदी करतात हे उघड करतो. रुकम कॅपिटलच्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय भागीदार अर्चना जहागीरदार म्हणाल्या, “भारताकडे बऱ्याच काळापासून मेट्रो शहरांच्या दृष्टिकोनातून पाहिले जात आहे, ज्यामुळे ग्राहकांबद्दलची आपली समज मर्यादित झाली आहे. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की ग्राहक अधिक आत्मविश्वासू होत आहेत. ते विचारपूर्वक खरेदी करतात, सखोल संशोधन करतात, समुदायाच्या शिफारशींवर अवलंबून असतात आणि जाहिरातींपेक्षा ठोस पुराव्यांवर विश्वास ठेवतात. हे ग्राहक केवळ इच्छेनुसार खरेदी करत नाहीत, तर त्यांच्या गरजांनुसार माहितीपूर्ण निर्णय घेतात. म्हणूनच, ब्रँड्सनी विश्वास निर्माण करणे, वापरण्यास सोपी उत्पादने डिझाइन करणे आणि स्थानिक गरजा पूर्ण करणे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तरच त्यांची शाश्वत आणि दीर्घकालीन वाढ सुनिश्चित होईल.” हा अहवाल अशा वेळी आला आहे जेव्हा भारतातील आर्थिक क्रियाकलाप महानगरांच्या पलीकडे जात आहेत. भारतातील 65% लोकसंख्या टियर 2, टियर 3 आणि ग्रामीण भागात राहते. अहवालानुसार, जीएसटी अंमलबजावणीची सोपी अंमलबजावणी, परवडणाऱ्या किमती, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा जलद विस्तार, सर्वव्यापी 3जी/4जी कव्हरेज आणि यूपीआयची सुरुवात यासारख्या अनेक प्रगतीमुळे भारतातील लहान शहरे उपभोग वाढीचे पुढील प्रमुख इंजिन बनली आहेत.

# सलून ब्युटीपार्लर क्षेत्राच्या उज्वल भवितव्यासाठी HBF विचार मंथन आवश्यक

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ब्युटीपार्लर क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य संस्था हेअर अँड ब्युटी फेडरेशन तर्फे नुकतेच उदयपूर राजस्थान येथे HBF मंथन आयोजित करण्यात आले. सलोन एज्युकेशनसाठी युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर राज्यस्तरीय बोर्डाची स्थापना करणे ,राज्यस्तरीय आणि देश स्तरावर स्पर्धा परीक्षा घेणे, या क्षेत्रात आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षितता याविषयी जागरूकता आणणे , घातक आणि डुप्लिकेट प्रॉडक्टसवर निर्बंध लादणे, सलून क्षेत्रात आर्थिक साक्षरता रुजविणे आणि सगळ्यात महत्त्वाचे या क्षेत्राला शासनाच्या अत्यावश्यक सेवेत आणणे अशा महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी भारतातील सर्व राज्यातील प्रमुख संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना एकत्र करून विचार मंथन करण्यात आले. हे विचार मंथन हेअर अँड ब्युटी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. अशोकजी पालीवाल उपाध्यक्ष श्री.उदय टक्के आणि श्री. साविओ परेरा यांच्या व्यवस्थापनाने संपन्न झाले. महाराष्ट्रातून सलून ब्युटीपार्लर असोसिएशन या संस्थेतर्फे अध्यक्ष श्री. प्रसाद चव्हाण, मुंबई अध्यक्ष श्री. तुषार चव्हाण आणि मुंबई सचिव श्री. सचिन टक्के, ठाणे जिल्हा समन्वयक श्री.बंधू चव्हाण तसेच चिपळूण नाभिक संस्थेचे अध्यक्ष श्री.महादेव चव्हाण आणि तालुकाअध्यक्ष श्री. संजय जाधव हे उपस्थित होते. या विचार मंथनामध्ये जी चर्चा आणि निर्णय झाले ते महाराष्ट्रातल्या तळागाळातल्या सर्व सलून ब्युटी पार्लर व्यावसायिकांपर्यंत पोहोचले पाहिजेत असे आवाहन महाराष्ट्रातील सर्व संस्थांना महाराष्ट्र प्रभारी श्री.उदयजी टक्के आणि सौ.हर्षदा टक्के यांनी केले आहे.

# बास्केटबॉल लीगच्या विस्तारासाठी एसीजी स्पोर्ट्‌सची भागीदारी

**महाराष्ट्र बास्केटबॉल लीग १४ ते २१ मार्चदरम्यान पुण्यात; अनिरुद्ध पोळे व राहुल झा यांची माहिती**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




देशातील पहिल्या व्यावसायिक बास्केटबॉल लीग, तसेच या खेळाला पोषक वातावरण उभारण्यास चालना देण्यासाठी एसीजी स्पोर्ट्सने एबीसी बास्केटबॉल डेव्हलपमेंट लीग यांच्यासोबत भागीदारी केली आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र बास्केटबॉल लीगचे १४ ते २१ मार्चदरम्यान पुण्यातील खराडी येथील राजाराम भिकू पठारे स्टेडियमवर आयोजन केले आहे. या स्पर्धेत आठ मुलांच्या आणि पाच मुलींच्या संघांचा सहभाग असणार असून, युवक खेळाडूंना व्यावसायिक, प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण स्पर्धात्मक अनुभव देण्याला प्राधान्य देण्यात येणार आहे.

अशी माहिती एसीजी स्पोर्ट्सचे स्ट्रॅटेजिक हेड राहुल झा आणि एबीसी बास्केटबॉल डेव्हलपमेंट लीगचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध पोळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. विमाननगर येथील फोर पॉइंट्स शेरेटोन हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेवेळी केरळ बास्केटबॉल संघटनेचे सचिव पी. सी. अँटोनी, तेलंगणा बास्केटबॉल संघटनेचे सचिव पृथ्वी रेड्डी आणि दिल्ली बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष मुकेश कालिया उपस्थित होते.

अनिरुद्ध पोळे म्हणाले, "एसीजी स्पोर्ट्स व एबीसी बास्केटबॉल डेव्हलपमेंट लीग यांच्या या संयुक्त उपक्रमाचा उद्देश राज्य व देशपातळीवर बास्केटबॉलसाठी दीर्घकालीन विकासात्मक मार्ग तयार करणे आहे. यामुळे तळागाळातील खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये संधी मिळणार आहे. २०२६ मध्ये महाराष्ट्र, केरळ, दिल्ली आणि तेलंगणामध्ये १४ व १८ वर्षांखालील गटांसाठी सात लीग आयोजित केल्या जाणार आहेत. पुढच्या टप्प्यात आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश व हरियाणा-चंदीगड येथेही बास्केटबॉल लीग भरविण्यात येणार आहेत."

राहुल झा म्हणाले, “भारतीय बास्केटबॉलच्या भविष्यासाठी खेळाडूंच्या विकासाचा संपूर्ण मार्ग उभारणे आवश्यक आहे. युवकांसाठी लीग आणि उच्च दर्जाच्या प्रशिक्षण व्यवस्थेतील समन्वयामुळे खेळाडूंना चांगल्या संधी मिळतील. या लीग फ्रँचायझी-आधारित असून, रचनात्मक प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून उदयोन्मुख खेळाडूंची ओळख व त्यांचा विकास साधला जाणार आहे. सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना एसीजीच्या 'हाय परफॉर्मन्स सेंटर्स'मध्ये चाचण्यांची संधीही दिली जाणार आहे."

प्रसिद्ध अभिनेता सुनील शेट्टी आणि रणविजय सिंग हे या लीगसाठी ब्रँड अँबेसेडर असणार आहेत. केरळ बास्केटबॉल लीगची सुरुवात आधीच झाली असून, दिल्ली आणि तेलंगणामधील लीग पुढील टप्प्यात राबविण्यात येणार आहेत. एसीजी स्पोर्ट्स ही एसीजी फार्मास्युटिकल समूहाची क्रीडा व्यवस्थापन शाखा असून, बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या सहकार्याने देशातील व्यावसायिक बास्केटबॉल आणि उच्च दर्जाच्या प्रशिक्षण पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कार्यरत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# सोहम साधना ग्रुपची 'वार्ता लिफ्ट' प्रथम!



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

श्री आनंद भारती समाज संस्था व महाराष्ट्र लोककलावंत प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निमंत्रित एकांकिका स्पर्धेत गोरेगाव येथील सोहम साधना ग्रुप सादर 'वार्ता लिफ्ट' या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावला.

स्पर्धेत गोरेगावच्या दिना केळुस्कर गटाची 'आत्मचरित्र' एकांकिका द्वितीय, तर डोंबिवलीच्या नटराज क्रिएशन सादर 'दृष्टी' या एकांकिकेला तृतीय क्रमांक मिळाला.

महाराष्ट्र लोककलावंत प्रतिष्ठानच्या १७व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून या स्पर्धेबरोबरच राज्यातील लोककलावंतांचा लोक गौरव पुरस्कार सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात ज्येष्ठ कादंबरीकार व नाटककार अशोक समेळ, संतोष पवार, लावणी मराठी सम्राज्ञी प्रियंका शेटे, आंतरराष्ट्रीय रिदम कलाकार अभिजीत कोळी तसेच दैनिक पुढारीच्या प्रतिनिधी अनुपमा गुंडे यांना महाराष्ट्र लोक गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारांचे वितरण प्रसिद्ध समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या हस्ते झाले. तसेच महाराष्ट्र लोककलावंत प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष स्व. मधुसूदन सुखदरे यांना महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार मरणोत्तर जाहीर करून त्यांच्या पत्नींचा सन्मान करण्यात आला.

दीपप्रज्वलन नानजीभाई खिमजीभाई ठक्कर, कृष्णकुमार कोळी, अरुण सोनार व अलका कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. उत्कृष्ट अभिनयासाठी दिना केळुस्कर तर उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून महेंद्र डोंगरे यांना गौरवण्यात आले.

कार्यक्रमस्थळ व उपस्थिती: चेदंणी कोळीवाडा येथील श्री आनंद भारती सभागृह येथे झालेल्या बक्षीस समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मंदार, टिल्लू ओम प्रकाश धिरोलीया, शांताराम धनावडे, कृष्णकुमार कोळी, दिलीप ठाणेकर, अरुण सोनार, कमलाकर कोळी, विकास थोरात, भरत मोरे व डॉ. प्रमोद नलावडे उपस्थित होते.

दिंडी, सादरीकरण व परीक्षक : प्रारंभी संस्थेच्या प्रांगणातून निघालेल्या दिंडीत सुनील ठाणेकर, विवेक मोरेकर, सुरेश नाखवा, आसू मोरेकर, दीपक कोळी, शैलेश कोळी, विकास थोरात, प्रकाश बडगुजर, अरुण खडपकर, विलास पाटील, विनोद नाखवा, संपदा कुलकर्णी, शालिनी कोळी, सुगंधा नांगरूत, योगिता नांगरूत व चंद्राराणी वाईकर सहभागी झाले.

यावेळी रंगा थिएटरची तरुणाई तसेच श्री आनंद भारती समाज संस्थाची 'दि लास्ट लास्ट सेंटेन्स' ही एकांकिका सादर झाली. परीक्षक म्हणून गजानन कराळे व भरत सावले यांनी काम पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रल्हाद नाखवा, सुरेश ठाणेकर, मानस कोळी, ऋषिकेश हिरवकर, संस्कृती येद्रे, जनार्दन कोळी, किशोर खांबे, योगेश कोळी, स्वप्नाली नाखवा व अरुण खडककर यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन माधुरी कोळी यांनी केले, तर सुनील ठाणेकर यांनी आभार मानले.



ठाणे ता 20 जाने : ठाणे महापालिकेने पाणीपट्टी वसुलीची मोहिम हाती घेतली असून जे नागरिक पाणापट्टी भरणार नाही अशा थकीत बिलधारकांचे नळसंयोजन खंडित करणे, मीटर रुम सील करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळसंयोजनाचे थकीत देयक चालू वर्षाच्या मागणीसह एक रकमी भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये (दंड / व्याज) 100 टक्के सूट लागू करण्यात आली आहे. थकीत पाणीपट्टी बिलावर 100 टक्के इतकी भरीव सवलत असून नागरिकांनी या योजनेचा लाभ घेवून थकीत पाणीबिल भरावे असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे. जे नागरिक आपली थकबाकीची रक्कम प्रलंबित ठेवतील अशा खातेदारांवर जप्ती कारवाई तात्काळ प्रस्तावित करुन नळ संयोजन खंडीत करणे, मिटर रुम सिल करणे व पंप जप्ती कारवाई सुरू आहे. तरी नागरिकांनी पाणी बिल भरुन कारवाई टाळावी असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आली आहे.



# पारनेरच्या आनंद हॉस्पिटलमध्ये आनंद मेळा

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर येथील डॉ. रफिक सय्यद (पारनेरकर) यांच्या 'आनंद हॉस्पिटल' मध्ये नुकताच भक्ती आणि सामाजिक ऐक्याचा एक अनोखा संगम पाहायला मिळाला. निमित्त होते एका अविस्मरणीय मेळाव्याचे, ज्याचे रूपांतर एका अविस्मरणीय 'सृजनाच्या सोहळ्यात' झाले.या आनंद मेळा मध्ये ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. सोपानकाका औटी, ह.भ.प. पांडुरंग महाराज गाडेकर ह.भ.प. यासीनभाई तांबोळी( काष्टीकर ) आणि ह.भ.प. गुलाबभाई तांबोळी या वारकरी संप्रदायातील कीर्तनकारांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. याप्रसंगी सन्माननीय सद्भावना मंचचे पदाधिकारी हमजेखा मोमीन, ज्येष्ठ पत्रकार भगवान गायकवाड आणि संत साहित्याचे अभ्यासक मारुती शेरकर( सर ) आदी मान्यवर उपस्थित होते. "धर्म आणि जातीच्या पलीकडे जाऊन माणुसकी आणि अध्यात्माची जोड कशी असावी, हेच या सोहळ्याने सिद्ध केले," आनंद हॉस्पिटलमध्ये जमलेल्या या दिग्गजांच्या उपस्थितीने हा सोहळा खऱ्या अर्थाने 'आनंद मेळा' ठरला.

# नाभिक समाजाची नवीन कार्यकारिणी जाहीर

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नाभिक समाजाची बैठक येथील पानसरे गल्लीतील पंचाचा वाडा येथे नुकतीच घेण्यात आली. ही बैठक खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. नवनिर्वाचित कार्यकारिणीसह समाजाचे सदस्य मोठ्या संख्येने या बैठकीसाठी उपस्थित होते. यावेळी अध्यक्षपदी सूर्यकांत सैंदाणे; तर कार्याध्यक्षपदी ज्ञानेश्वर निकम यांची एकमताने निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष सूर्यकांत सैंदाणे यांनी मागील बैठकीचा वृत्तांत वाचून दाखवला. मावळते अध्यक्ष रामदास आहेर यांनी मंदिराच्या बांधकामाच्या सद्यस्थितीबाबत माहिती दिली आणि देणगीदारांची नावे सांगितली.

# कर्जुले हर्या–वासुंदे रस्त्याचे भूमिपूजन संपन्न

- **दळणवळणाचा मोठा प्रश्न सुटणार :- सुजित झावरे पाटील**



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

कर्जुले हर्या ते वासुंदे या सुमारे ४ किलोमीटर लांबीच्या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या डांबरीकरण कामाचे भूमिपूजन शिवसेना नेते व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते पार पडले. या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून जवळपास ३.७५ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला आहे.

भूमिपूजन प्रसंगी बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले की, आजपर्यंत तालुक्यातील अनेक वाडी व वस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांसाठी निधी मंजूर करून देण्यात आला असून त्यामुळे तालुक्यातील दळणवळणाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला आहे. येणाऱ्या काळातही तालुक्यातील रस्ते विकास व जलसंधारणाची कामे प्राधान्याने करण्यासाठी आपण कायम तत्पर राहणार आहोत. विशेषतः दोन गावांना जोडणारे परंतु आजवर दुर्लक्षित राहिलेले रस्ते मंजूर करून घेण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे त्यांनी ठामपणे सांगितले. कर्जुले हर्या, वासुंदे तसेच परिसरातील अनेक गावांना तालुक्याच्या मुख्य ठिकाणांशी जोडणारा महत्त्वाचा दुवा असणाऱ्या या रस्त्याच्या कामामुळे परिसरातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच व्यापाऱ्यांची दळणवळणाची मोठी अडचण दूर होणार असून प्रवास अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि जलद होणार आहे. विशेषतः शेतीमाल वाहतूक, दैनंदिन व्यवहार आणि आपत्कालीन सेवांसाठी हा रस्ता अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या रस्त्याच्या कामामुळे कर्जुले हर्या, वासुंदे आणि आसपासच्या अनेक गावांतील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागणार असून गावोगावी पायाभूत सुविधांचा विकास झाला तरच ग्रामीण भाग खऱ्या अर्थाने सक्षम होईल, अशी भावना यावेळी सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केली.


या कार्यक्रमाला परिसरातील गावाचे सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हा.चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य, सहकारी संस्थांचे संचालक, विविध संस्थांचे मान्यवर पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनीच या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत सुजित झावरे पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

# कुरुंद बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

## विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून दिला सामाजिक संदेश

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील कुरूंद येथील बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे १७ वे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी सायंकाळी मोठ्या उत्साहात पार पडले. शाळेच्या प्रांगणात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या स्नेहसंमेलनात समूहनृत्य आणि पथनाट्यातून सामाजिक संदेश देण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक बबन जाधव उपस्थित होते. पहिली ते नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मोबाईलचे दुष्परिणाम, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, धनगर समाजाचे जीवन, भारतीय सैनिकांचे शौर्य, शेतकऱ्यांचे प्रश्न, पाणी वाचवा तसेच 'ऑपरेशन सिंदूर' या विषयांवर समूहनृत्य आणि सामाजिक संदेश देणारे पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी शाळेची उभारणी करताना विविध स्तरांवर करावा लागलेला संघर्ष संस्थापक बी. बी. पाटील यांनी 'माझी जीवनबाग' या कवितेतून प्रभावीपणे मांडला. त्यांच्या या सादरीकरणाला उपस्थितांकडून विशेष दाद मिळाली. कार्यक्रमाला माजी उपसभापती गुरुनाथ जाधव, ॲड. प्रदीप मते, भाजप भिवंडी ग्रामीण पूर्व मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत गायकर, संजय पटेल, मनोहर भोईर, काशीनाथ तारमळे, डुकले यांच्यासह मुख्याध्यापिका मोनिका मराडे आणि अनामिका पाटील उपस्थित होते. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानांतर्गत तालुक्यात हायस्कूलने प्रथम क्रमांक पटकावल्याची माहिती मोनिका मराडे यांनी दिली.



# शिक्षकांचे सर्व प्रश्न सोडविण्याची शिवसेनेची ग्वाही

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या नांदेड जिल्हा शाखेने आयोजित केलेला जिल्हास्तरीय मेळावा जिल्ह्यातील तमाम शिक्षक शिक्षिकांसाठी प्रेरणादायी झाला असल्याचे प्रतिपादन शिवसेना (उबाठा)चे माजी आमदार तथा संपर्क प्रमुख रोहिदास चव्हाण यांनी केले. ते मेळाव्याचे उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण, प्रमुख पाहुणे शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख बबन बारसे, शिवसेना महानगर प्रमुख प्रकाश मारावार, शिक्षक सेनेचे मराठवाडा कार्याध्यक्ष बाळासाहेब राखे, परभणी जिल्हाध्यक्ष सायस चिलगर, युवा शहर प्रमुख नवज्योतसिंग गाडीवाले, उपजिल्हा प्रमुख पाशाभाई, रामराव मोरे, मधुकर मठपती, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, परशुराम येसलवाड, तानाजी पवार आदींची उपस्थिती होती.

# निघोज येथे बिबट्या जेरबंद

- **बिबट्याच्या दुसऱ्या साथीदाराला पकडण्याची ग्रामस्थांची मागणी**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

निघोज येथील वेताळबाबा स्टेडियम पासून फक्त एक किलोमीटर अंतरावर असलेल्या मुकामळा येथील लामखडे - वरखडे वस्तीवरील पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला असून अद्यापही आणखीन एक बिबट्या या परिसरात दिसत असून त्याचा बंदोबस्त करण्यासाठी परिसरात दोन पिंजऱ्यांची गरज असून वनविभागाने याची दखल घेण्याची मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे. सोमवार दि.१९ ते मंगळवारी पहाटेच्या दरम्यान बिबट्या पिंजऱ्यात अडकला आहे. गेली एक महिन्यापूर्वी ग्रामपंचायतचे माजी सदस्य पोपटराव राणू लामखडे यांनी मुकामळा परिसरात बिबट्याचा उपद्रव सुरू झाला असून लामखडे यांच्या कालवडीला फस्त करण्याचे काम बिबट्याने केले असल्याची माहिती लामखडे यांनी पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज या ठिकाणी येऊन दिली. त्यानंतर पत्रकार संघाने वनविभाग अधिकाऱ्यांनी चर्चा करुण मुकामळा परिसरात तातडीने पिंजरा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. संबंधित वस्तीवरील युवकांनी परिसरातील दहा ते बारा किलोमीटर अंतरावर असलेला पिंजरा या ठिकाणी आणून ठेवला मात्र त्यानंतरही या बिबट्याच्या जोडीने रात्री अपरात्री येऊन कोंबड्या,शेळ्या,कालवडी फस्त करण्याचे काम केले. महिनाभरात जवळपास या वस्तीवरील लोकांची दोन ते तीन लाखांचे जनावरे या दोन बिबट्यांनी फस्त केले आहेत. बिबट्याच्या भितीने या परिसरातील शेतकऱ्यांनी शेतीचे कामे सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत पुर्ण करीत असत. सहा नंतर घरात अशी दहशत या बिबट्याच्या जोडीने निर्माण केली होती. मात्र हा बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाल्याने थोडी दहशत कमी झाली असली तरी दुसऱ्या बिबट्याला पकडण्याचे आव्हान मात्र कायम असल्याने वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी काय भुमिका घेतात याकडे लक्ष वेधले गेले आहे. हा बिबट्या साधारण दोन वर्षाचा असून दुसरा बिबट्या मात्र यापेक्षा मोठा असून हा बिबट्या लवकरात लवकर जेरबंद करावा अशी मागणी या परिसरातील ग्रामस्थांनी वनविभाग अधिकाऱ्यांकडे केली आहे. मंगळवार दि.२० रोजी सकाळी अकरा वाजता वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन धाडे, वनपरिमंडळ अधिकारी साहेबराव भालेकर, वनरक्षक रेश्मा पाठक, वनसेवक विठ्ठल वाढवणे यांनी मुकामळा या ठिकाणी येऊन ब बिबट्याला ताब्यात घेतले असून. पारनेर येथील या बिबट्याची आरोग्य तपासणी करुन हा बिबट्या पारनेर पासून २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या वडगाव सावताळ जवळील नर्सरीमध्ये नेणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे.



ठाणे महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेविका सौ. अर्चना निलेश पाटील या विजयी झाल्यानंतर आपल्या प्रभागात ॲक्शन मोडवर दिसून आल्या. ठाणे पालिकेच्या साबेगाव येथील ८० नंबर शाळेसमोर वाहत असलेलं गटाराच्या सांडपाण्यामुळे नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना होणारा त्रास लक्षात घेता तात्काळ सफाई कर्मचाऱ्यांकडून सकाळच्या वेळेस स्वतः उभे राहून सदर तक्रारीचे निवारण करण्यात केले.

**(फोटो - संतोष पडवळ)**

# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाजाचा ३२ वा वार्षिक महोत्सव ठाण्यात उत्साहात संपन्न!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाजाचा ३२ वा वार्षिक महोत्सव दि. 18 जानेवारी 2026 रोजी ठाणे येथील जय भगवान हॉल येथे भक्ती, उत्साह व सांस्कृतिक वैभवाच्या वातावरणात मोठ्या थाटात संपन्न झाला. समाजबांधवांची लक्षणीय उपस्थिती, शिस्तबद्ध आयोजन आणि प्रेरणादायी उपक्रमांमुळे हा महोत्सव संस्मरणीय ठरला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन, पूजा व आरती पार पडली. त्यानंतर "तेरा मंगल, मेरा मंगल" या भावस्पर्शी भक्तीपर प्रार्थनांनी सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. मान्यवरांचे स्वागत ए. कल्याणी रावतोले यांनी सादर केलेल्या मधुर स्वागतगीताने करण्यात आले.

या सोहळ्यासाठी व्यासपीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (उद्योजक व प्रसिद्ध समाजसेवक), गोविंदा पांडुरंगसा दाणेज (अतिरिक्त जिल्हाधिकारी, अमरावती), संजय वालचंदसा कोकणे (उद्योगपती, नाशिक), मायाबेन विष्णूभाई बरड (भाजपा महिला मोर्चा सरचिटणीस, सुरत), विश्वनाथ पेंजणे (संयुक्त आयुक्त, राज्य जीएसटी, मुंबई), डॉ. अनिल नांदगावकर (विशेष कर्तव्य अधिकारी – गुणवत्ता कक्ष, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई), यशवंतभाई रावतोले (सोसायटी अध्यक्ष) व गणपत क्षत्रिय (सोसायटी उपाध्यक्ष) यांचा समावेश होता.

सत्कार व प्रोत्साहन : सर्व मान्यवरांचा शाल, फळे, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा आदरपूर्वक सत्कार करण्यात आला. तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन प्रोत्साहन देण्यात आले.

प्रेरणादायी मार्गदर्शन : मान्यवरांनी आपल्या भाषणांत सामाजिक ऐक्य, शिक्षणाचे महत्त्व, तरुणांची जबाबदारी व नैतिक मूल्यांची जोपासना यावर मोलाचे विचार मांडले. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण व संस्कारांची भूमिका अधोरेखित करण्यात आली.

सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम : महिलांच्या गिटार वादन, गायन व नृत्य सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. या वेळी एका पवित्र मोत्याच्या हाराचा लिलाव करून तो एका श्रीमंत कुटुंबाला दान करण्यात आला. दुपारच्या जेवणानंतर महिलांसाठी हळद-कुंकू कार्यक्रम घेण्यात आला. ट्रस्टच्या वतीने तीन पवित्र चांदीच्या नाण्यांचा लकी ड्रॉ काढण्यात आला असून तीन भाग्यवान विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

आभार व समारोप : कार्यक्रमासाठी आपला सुंदर हॉल अत्यंत सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्याबद्दल नानजीभाई ठक्कर यांचे आयोजकांच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. आयोजन समितीच्या उत्कृष्ट नियोजनामुळे महोत्सव यशस्वीरित्या पार पडला असून उपस्थित सर्वांनी समाधान व्यक्त केले.

# समाजाला कठोर वास्तवाची जाणीव गरजेची

## ह. भ. प. निलेश महाराज कोरडे

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

आजचा समाज स्वार्थ, अहंकार व भौतिक सुखांच्या अंध स्पर्धेत अडकून माणुसकी, संस्कार आणि कुटुंबमूल्ये विसरत चालला आहे. देवाच्या शोधात माणूस आई-वडिलांनाच विसरतो आहे. अशा परिस्थितीत आई-वडिलांची निःस्वार्थ सेवा हाच खरा धर्म असल्याचे परखड मत ह.भ.प. निलेश महाराज कोरडे यांनी व्यक्त केले.

श्रीगोंदा तालुक्यातील येळपणे–ठाणगेवाडी येथे श्री संत सदगुरू बाळुमामा देवस्थान ट्रस्टच्या वतीने अमावस्या निमित्त आयोजित किर्तन सेवेत ते बोलत होते. संतवाणीच्या ठाम व प्रभावी शब्दांत त्यांनी समाजाला अंतर्मुख करणारा आणि विचार करायला भाग पाडणारा संदेश दिला.

“काळी आईची सेवा करा, मुलांनी कर्तृत्ववान व्हा. आई-वडिलांच्या डोळ्यात जर अश्रू असतील, तर तुमचं यश हे यश नसून पाप आहे,” अशा जळजळीत शब्दांत त्यांनी तरुण पिढीला खडसावले. आई-वडिलांची मान खाली घालणं म्हणजे स्वतःचं चारित्र्य मातीमोल करण्यासारखं असल्याचा सडेतोड इशाराही त्यांनी दिला.

घरातूनच संस्कार मिळाले नाहीत, म्हणूनच आज न्यायालये, तहसील कार्यालये व पोलीस स्टेशनच्या पायऱ्या गजबजल्या आहेत. घर सावरलं, तर समाज आपोआप सावरतो, हा संतवाणीचा कठोर गाभा त्यांनी ठामपणे मांडला. अहंकार माणसाला देवापासून दूर नेतो, तर नम्रता देवाला माणसाच्या उंबरठ्यावर आणते. देव मंदिरात कमी आणि माणसाच्या सेवेत अधिक प्रसन्न होतो, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.“संस्कार घरातूनच मिळाले पाहिजेत,” हा मूलमंत्र उपस्थितांच्या मनावर ठसवत त्यांनी स्वार्थ, अहंकार, व्यसनाधीनता आणि नैतिक अधःपतनावर जोरदार प्रहार केला.



हे किर्तन केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता समाजप्रबोधनाची प्रभावी हाक ठरले. या कार्यक्रमास हजारो भाविकांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे आयोजन रामदास पोपट पवार यांनी केले होते. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष हनुमंत ठागणे, उद्योजक सचिन कातोरे, महाराष्ट्र पोलीस खंडेराव शिंदे, कुशाबा शिंदे, सुधीर घेगडे, भाऊसाहेब लकडे, पुजारी भुजबळ मामा, रामदास कोळपे, राजेंद्र ढुस, बाबुराव शिंदे, रावसाहेब ठाणगे, रविंद्र ठाणगे, सुखदेव कोळपे, स्वप्निल ढुस, गोकुळ ढुस, आकाश मोटे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते.

# लोकसहभागातून मिळणार वैष्णवीला चालण्याचे बळ

**(समर्थ गांवकरी)**

शिकण्याची जिद्द आणि कष्टाची तयारी असलेल्या वैष्णवीला पायाने अपंगत्व आल्याने जीवनाचे दोर छाटल्या सारखे झाले होते परंतु पंचायत समितीच्या दिव्यांग विशेष शिक्षकांच्या मदतीने वैष्णवीला उपचारासाठी दोन लाख रुपयाची मदत मिळाली आणि तिला चालण्याचे बळ मिळाले. येथील कैलासराव पाटील विद्यालयात इयत्ता दहावीत शिक्षण घेणारी वैष्णवी नवनाथ मापारी हि विद्यार्थीनी तिला एका पायाने अकाली अपंगत्व आले होते. एका पायाने जीवनाचा प्रवास सुरु झाला. परंतु मनातील जिद्द आणि कष्टाची तयारी याबरोबरच जगण्याचे सामर्थ्यही खचले. आयुष्यभर अपंगत्वावर मात करावी लागणार म्हणून ध्येयापर्यंत पोहचणेही कठीण आहे असा तिच्या मनाचा निर्धार झाला. आपल्याला जीवनात खुप मोठे ध्येय गाठायचे आहे असे



स्वप्न बाळगणाऱ्या वैष्णवीचे ध्येय हे स्वप्नच राहणार असा विचार तिला सारखा सतावत होता. परंतु वैजापुर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर यांच्या मार्गदर्शनाने दिव्यांग विशेष शिक्षक बाबासाहेब जगताप, रमेश बागुल संतोष राठोड, गणेश साळुखे, संतोष मरेवार, रामदास इंगोले, गफुर पठाण, कोल्हे सर या सर्वाच्या सहकार्याने वैष्णवीच्या उपचारासाठी मदतीचे आवाहन करण्यात आले. यावेळी प्रशासकिय अधिकारी, कर्मचारी, व्यापारी, उद्योजक, शेतकरी, कामगार सर्वच स्थरातून मदतीचा ओघ सुरु झाला आणि वैष्णवीच्या उपचारासाठी आवश्यक असलेली रक्कम जमा झाली. आणि तिच्या चेहर्यावर हास्य फुलले. लवकरच वैष्णवी उपचार घेणार असून तिच्या कुटुंबियांनी सहकार्य करणाऱ्या शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी त्यांचे सहकारी सर्व दिव्यांग विशेष शिक्षक व मदत करणारे दानशुर या सर्वांचे आभार मानले.

# चेअरमनपदी दळवी व्हाईस चेअरमन पदी पवार

**गणोरे : (समर्थ गांवकरी)**

गणोरे (ता.अकोले) येथील आर्थिक दृष्ट्या समृद्ध असलेल्या विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी रावसाहेब गोविंद दळवी उर्फ लालूशेठ दळवी यांची तर व्हा. चेअरमन पदी सुनील नामदेव पवार यांची एकमताने निवड करण्यात आली. विवेकानंद ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची सभा निवडणुक निर्णय अधिकारी अकोले येथील सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे यांच्या अध्यक्षते खाली नुकतीच संपन्न झाली.यावेळी चेअरमन पदासाठी रावसाहेब गोविंद दळवी व अनिल काशिनाथ डोळस असे दोन अर्ज तर व्हॉइस चेअरमन पदासाठी सुनील नामदेव पवार यांचा एकमेव अर्ज राहिल्याने सुनिल पवार यांची व्हा चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली. चेअरमन पदासाठी रावसाहेब गोविंद दळवी यांना आठ तर अनिल काशिनाथ डोळस यांना तीन मते मिळाल्याने रावसाहेब गोविंद दळवी उर्फ लालू शेठ दळवी यांची चेअरमन पदी निवड झाली. यावेळी चेअरमन पदासाठी रावसाहेब गोविंद दळवी यांच्या नावाची सूचना परसराम नामदेव उगले यांनी केली तर नामदेव किसन आंबरे यांनी अनुमोदन दिले सुनील नामदेव पवार यांच्या नावाची सूचना दिलीप कोंडीबा आहेर यांनी केली तर त्यास





चंद्रशेखर कोंडीबा आंबरे यांनी अनुमोदन दिले. यावेळी दादापाटील वाकचौरे, परसराम उगले, नामदेव आंब्रे तुकाराम गोर्डे, राजुबाई अशोक आहेर, मनिषा अण्णासाहेब गोर्डे, अनिल डोळस, चंद्रशेखर आंबरे, दिलीप आहेर, कार्यकारी संचालक सोमनाथ नेहे,संतोष देशमुख, सुभाष आंबरे, शिवाजी आंबरे, सतीश सरोदे, संदिप वाकचौरे, विवेक राऊत, अश्विनी आंबरे, कोमल उगले, योगेश आहेर आदी उपस्थित होते. यावेळी निवडणूक अधिकारी अमोल वाघमारे व सहाय्यक निवडणूक अधिकारी एस ए नेहे यांनी काम पाहिले. निवडी नंतर चेअरमन व व्हा चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला.

# गंगा कदम यांचा सन्मान समारंभ

**(समर्थ गांवकरी)**

एच. व्ही देसाई आय हॉस्पिटल, पुणे चा प्रकल्प असलेल्या सोलापूर येथील शंकरशेठ साबळे नेत्ररुग्णालय, बाळे येथे भारताच्या अंध महिला क्रिकेट संघाच्या उपकर्णधार श्रीमती गंगा कदम यांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या सत्कार समारंभाला रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. रेश्मा मेहता, मुख्य प्रशासकीय अधिकारी सुधीर सुधाळ आणि मुख्य कामकाज अधिकारी डॉ.सुशीला कवाडे, तसेच प्रशिक्षक श्री. अनिल सामराणी हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस नर्सिंग प्रमुख अमलदास घोडके यांनी रुग्णालयाच्या कार्यपद्धतीबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, रुग्णालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंत २००० पेक्षा अधिक यशस्वी नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

# १०वी/१२ वी च्या विद्यार्थ्यांना करियर मार्गदर्शन

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

स्कुल कनेक्ट उपक्रमाअंतर्गत आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज,विरगाव च्या वतीने अकोले,संगमनेर व सिन्नर तालुक्यातील ४७ माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि आश्रमशाळा यांना भेटी देऊन १० वी व १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी- विद्यार्थिनींना करियर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये १० वी-१२वी उत्तीर्ण झाल्यावर आपल्या जीवनाची दिशा निश्चित करण्याची वेळ असते,कारण आपली एकदा दिशा, ध्येय ठरले की,त्यामध्ये बदल करणे नुकसानीचे ठरू शकते.यावेळी विद्यार्थ्यांना अनेक करियर करण्यासारख्या क्षेत्राची माहिती देण्यात आली. आपल्याला करियर कशामध्ये करायचे त्यासाठी विविध तज्ज्ञांशी चर्चा करावी,यशस्वी लोकांशी



संवाद साधावा असे सांगितले. इंजिनीरिंग, वैद्यकीय, स्पर्धा परीक्षा, व्यवसाय अशा विविध क्षेत्रातील करियरची माहिती देण्यात आली.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांशी संवाद साधला,त्यामध्ये विद्यार्थ्यांनीही आपल्या शंकाचे निरसन करून घेतले. यावेळी आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज विरगाव येथे सुरू असलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, मेकॅनिकल, सिव्हिल, कॉम्प्युटर , इलेक्ट्रिकल-इलेक्ट्रॉनिक इंजिनीरिंग या विभागाची माहिती दिली तसेच संस्थेत सुरू असलेल्या डी फार्मसी,बी फार्मसी आणि ऍक्युपंक्चर डिप्लोमा विषयी माहिती दिली.तसेच या शिक्षणासाठी शासनाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती या विषयी मार्गदर्शन केले व या सर्वांचा लाभ घेऊन आपले करियर यशस्वी करावे असे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सर्व प्रथम १० वी व १२ वी च्या परिक्षेवर लक्ष केंद्रित करून चांगले गुण मिळवावे व त्यांनतर आपली पुढील जीवनाची दिशा ठरवावी असे सांगून सर्वांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज,विरगाव चे को- ओर्डीनेटर विद्याचंद्र सातपुते,प्रा.आकाश डोखे,प्रा.प्राजक्ता सावंत,प्रा.पूजा शेळके,प्रा.अनिता पथवे,प्रा.आदित्य गोडगे,माने रविराज, धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडीयम स्कुलचे प्रा. संदीप थोरात,प्रा.सांगळे,प्रा. नाईकवाडी हे उपस्थित होते.

# पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकारांचा सन्मान

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. समाजातील वास्तव मांडणे, अन्यायाविरोधात आवाज उठवणे आणि सर्वसामान्यांच्या समस्या सत्तेपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार सातत्याने करत असतात. या भूमिकेचा सन्मान राखत पेडगाव येथे रोहिदास पवार यांनी पत्रकार दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात समाजातील विविध घटकांमधून पत्रकारांच्या योगदानाची मुक्तकंठाने प्रशंसा करण्यात आली.

या कार्यक्रमानंतर आयोजित पत्रकार परिषदेत पेडगाव सोसायटीचे माजी चेअरमन व विद्यमान सदस्य रोहिदास पवार यांनी मोठी राजकीय घोषणा करत आगामी निवडणुकीत भाजपच्या वतीने निवडणूक लढवण्याचे स्पष्ट संकेत दिले.



माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विद्यमान आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आपण ही राजकीय वाटचाल सुरू करत असल्याचे त्यांनी सांगितले.

रोहिदास पवार म्हणाले की, “शेतकरी, कामगार, तरुण आणि सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नांसाठी मी थेट राजकारणात उतरून लढा देणार आहे. आतापर्यंत सहकार क्षेत्रात काम करताना अनेक अडचणी प्रत्यक्ष अनुभवल्या. आता त्या समस्यांवर धोरणात्मक पातळीवर उपाय करण्याची गरज आहे.” सध्या त्यांचा गावभेट दौरा सुरू असून, जनतेचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

विशेष म्हणजे, पक्षश्रेष्ठींनी उमेदवारी दिली नाही, तरीही आपण पक्षसंघटनेसाठी प्रामाणिकपणे काम करत राहू, अशी स्पष्ट भूमिका पवार यांनी मांडली. ही भूमिका त्यांच्या राजकीय परिपक्वतेचे आणि पक्षनिष्ठेचे दर्शन घडवणारी ठरली.

या कार्यक्रमात पत्रकार अंकुश शिंदे, पीटर रणसिंग, दत्ता जगताप, सुहास कुलकर्णी, चंदनजी घोडके यांनी मनोगत व्यक्त करत पत्रकारांच्या सामाजिक भूमिकेवर प्रकाश टाकला. पत्रकार दत्ता जगताप यांनी आभारप्रदर्शन केले. यावेळी श्रीगोंदा तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

“पत्रकार जसे समाजातील वास्तव समोर आणतात, तसेच जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी मला आता थेट लोकप्रतिनिधी म्हणून काम करायचे आहे,” असे रोहिदास पवार यांनी सांगितले. त्यांनी सहकार क्षेत्रातील आपल्या कार्याचा आढावा घेत, भविष्यातील विकासाचा आराखडाही मांडला. शिक्षण, आरोग्य, पाणी, रस्ते, रोजगार आणि शेतीसाठी पूरक योजना राबवण्यावर आपला भर राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# जनतेमध्ये प्रचंड नाराजी

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी वाराणसी येथे बांधलेल्या ऐतिहासिक मणिकर्णिका घाटावर झालेल्या पाडकामाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत, थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे निवेदन देवून लक्ष वेधले आहे. सभापती राम शिंदे हे २८ व्या कॉमनवेल्थ स्पीकर्स आणि प्रिसायडिंग ऑफिसर्स परिषदेनिमित्त दिल्ली दौऱ्यावर आहेत. सभापती प्रा. शिंदे यांनी गुरूवारी ( ता. १५ ) वाराणसीच्या मणिकर्णिका घाटाच्या मुद्द्याकडे केंद्र सरकार व उत्तर प्रदेश सरकारचे लक्ष वेधले. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून, या प्रकरणाचे गांभीर्य निदर्शनास आणून दिले.

# हिवाळी श्रमदान शिबिर यशस्वीरीत्या संपन्न

**(समर्थ गांवकरी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ (DBATU), लोणेरे संलग्न विद्या निकेतन इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, बोटा यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना (NSS) हिवाळी विशेष शिबिर दि. ८ ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या पार पडले. हे शिबिर चंदनापुरी, अकलापूर व खंदरमाळ (ता. संगमनेर) या दत्तक गावांमध्ये राबविण्यात आले. सात दिवसांच्या या शिबिरात एनएसएस स्वयंसेवकांमार्फत विविध सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. चंदनापुरी येथे चंदनेश्वर विद्यालयाचे श्री. राहणे सर यांनी विद्यार्थ्यांना एनएसएसचे महत्त्व, सामाजिक जबाबदारी व सेवाभाव याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजकार्याची



जाणीव अधिक दृढ झाली. अकलापूर येथे तळेकर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक प्रबोधन व व्यसनमुक्ती विषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. तर खंदरमाळ येथे खंदरेश्वर मंदिरात योगी धर्मनाथजी महाराज यांनी विद्यार्थ्यांना आध्यात्मिक मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये, शिस्त, सकारात्मक विचारसरणी व आत्मविकासाचे महत्त्व समजावून सांगितले. या कार्यक्रमास स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. खंदरमाळ येथेच सरपंच श्री. गणेश लेंडे तसेच खंदरमाळ विद्यालयाचे प्राचार्य श्री. प्रमोद लेंडे सर यांच्या सहकार्याने स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, ग्रामसर्वेक्षण व आरोग्यविषयक जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. हे शिबिर संस्थेचे प्राचार्य डॉ. शिंदे किरण यांच्या मार्गदर्शनाखाली, एनएसएस समन्वयक प्रा. योगेश तांबडे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडले.

# पिटर रणसिंग यांची जिल्हा सचिवपदी निवड

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ अहिल्यानगर सचिवपदी तालुका श्रीगोंदा येथील रहिवासी दैनिक गावकरीचे प्रतिनिधी पिटर रणसिंग यांची बिनविरोध नियुक्ति करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे संघटक संजयजी भोकरे व राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली हि निवड करण्यात आली आहे.

श्रीगोंदा येथील शासकीय विश्रामगृह येथे दि.20 रोजी पत्रकार संघाच्या बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्हाध्यक्ष पाचपुते यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले. निवडी नंतर विविध मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.



निवडीला प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद परदेशी, तालुका अध्यक्ष सुरेशमामा सुपेकर, संजय शेळके,विजय भंडारे, वामन बदे.जेष्ठ पत्रकार व नुतन नगरसेवक अमिनभाई शेख, अंकुश तुपे, रामदास कोळपे,पंकज गणवीर, सुरेश हिरवे, दादासाहेब सोनवणे, प्रा. राम सोनवणे, यांच्यासह मान्यवर पदाधिकारी हजर होते. शेवटी पत्रकार आप्पा चव्हाण यांनी सर्वाचे आभार मानले.

# ४५वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

## ‘प्रेमात आज रीत बदलली’ : कवयित्री गुंजन पाटील

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात ४५ वा वार्षिक पारितोषिक वितरण व विविध गुणदर्शन समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद सूर्यवंशी यांनी केले. त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक व गुणात्मक प्रगतीचा आलेख मांडत, शिवाजीराव नागवडे (बापू) यांचे स्वप्न साकार झाल्याची भावना व्यक्त केली. नॅक मूल्यांकनात मिळालेला A+ दर्जा ही महाविद्यालयाच्या गुणवत्तेची पावती असून, संस्था अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली व संचालक मंडळाच्या विश्वासातून हे यश मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. गुणवत्ता, शिस्त व कौशल्यविकासाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होत असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या ४५ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थी, प्राध्यापक तसेच प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रगती अहवाल प्रा. नंदकुमार पवार यांनी, तर वरिष्ठ महाविद्यालयाचा प्रगती अहवाल डॉ. मिलिंद बेडसे यांनी सादर केला. विविध क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या




विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यासोबतच विविध गुणदर्शन कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना व्यासपीठ मिळाले. गायन, वादन, नृत्य व नाट्य सादरीकरणाने कार्यक्रमाला रंगत आणली. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध युवा कवयित्री कु. गुंजन पाटील उपस्थित होत्या. त्यांच्या काव्यवाचनाने उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले. गुरु, आई, समाजमाध्यमे तसेच आजच्या तरुणाईतील प्रेमभावना यांवर भाष्य करणाऱ्या त्यांच्या कविता विशेष गाजल्या. ‘प्रेमात आज रीत बदलली’, ‘एकदाच मिळते जवानी’, ‘प्रेमात फार भ्रष्टाचार आहे’, ‘प्रेम कोणत्याच शब्दाला जागत नाही’, ‘मला आईत बाबा आणि बापात आई शोधायची आहे’ या स्वलिखित कवितांतून आजच्या पिढीतील प्रेमाच्या बदलत्या स्वरूपाचे वास्तववादी चित्रण त्यांनी केले. ओढ, विरह, हळवी स्पंदने, प्रेमभंग यांचे सूक्ष्म भावस्पर्शी दर्शन घडवताना डेटिंगपासून मीटिंगपर्यंतच्या प्रवासावर त्यांनी परखड भाष्य केले. ‘मला आई व्हायचे नाही’ या कवितेद्वारे आईतील निडरता व वडिलांतील भावनिक कोमलता त्यांनी प्रभावीपणे उलगडली, ज्यामुळे श्रोत्यांची मने हेलावून गेली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शरद जगताप होते. त्यांनी महाविद्यालयाच्या झालेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत, विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रात यशस्वी वाटचाल करावी, मात्र बापूंनी समाजासाठी केलेल्या त्यागाची जाणीव सदैव ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. वैयक्तिक स्वार्थ, कुटुंब किंवा पैशासाठी नव्हे, तर समाजासाठी बापूंनी स्वतःला झोकून दिल्याचे त्यांनी अधोरेखित केले आणि त्यांच्या विचाररूपी वटवृक्षाचे जतन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून संचालक भाऊसाहेब बरकडे, विश्वनाथ गिरमकर, मारुती पाचपुते, प्रा. सुरेश रसाळ, प्राजक्ता जगताप, नितीन वाबळे, अनिल वाबळे, केशव कातोरे, प्रा. शिवाजी कदम, लगड मॅडम, जामदार मॅडम, उपप्राचार्य चंद्रभान कातोरे, पर्यवेक्षक प्रवीण टकले, प्राध्यापक-प्राध्यापिका तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सविता लोखंडे यांनी केले.






# पोदार प्रेपचा वार्षिक क्रीडा दिन उत्साहात साजरा

## 'जंबो इन स्ट्रिंग्स अँड स्प्रिंट्स' संकल्पनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

हिंदुस्थानात शिक्षण क्षेत्रात पोदार इन्स्टिट्यूट हे जगातील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरेल या संस्थेने विद्यार्थ्यांच्या शिक्षणात जो अमुलाग्र बदल घडविला त्यामुळे उद्याच्या आदर्श भारताचे नागरिक व विविध क्षेत्रात या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात मागणी होत असल्याचे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी पोदार प्रेप(Podar Prep) शाळेचा २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक क्रीडा दिन 'जंबो इन स्ट्रिंग्स अँड स्प्रिंट्स' (Jumbo in Strings and Sprints) बोलताना व्यक्त केले........ यावेळी डॉ . स्वाती वत्स (संचालिका, पोदार प्रेप) यांच्या आगळ्या वेगळ्या व आकर्षक संकल्पनेखाली नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. चिमुकल्यांच्या कलागुणांना आणि शारीरिक कौशल्यांना वाव देणाऱ्या या कार्यक्रमाला दैनिक गावकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे (Dr. Vishwasrao Arote, Editor Dainik Gavkari) यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली.

प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन: डॉ. आरोटे यांनी आपल्या भाषणात खेळ आणि शारीरिक हालचालींचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता, खेळाच्या माध्यमातून शिस्त, सांघिक कार्य आणि निरोगी जीवनशैली आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले.

पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका सौ सोनल शुक्ला यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करत पालकांचे शब्दसुमनांनी स्वागत केले.

पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या सौ. मिनाक्षी मिश्रा यांनी पालकांशी संवाद साधताना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी व शिक्षकांनी केलेल्या मेहनतीचे कौतुक केले. या क्रीडा दिनानिमित्त पूर्व-प्राथमिक मुलांसाठी विविध मजेदार शर्यती, योगासने, रिबन डान्स, अडथळा शर्यती आणि पॅराशूट प्ले यांसारखे नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने यात सहभाग घेतला आणि आपले क्रीडा कौशल्य दाखवून दिले.

मुलांच्या मनोरंजनासोबतच पालकांसाठीही विविध स्पर्धात्मक खेळ आणि उपक्रम आयोजित करण्यात आले होते. पालकांनीही यात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला, ज्यामुळे कार्यक्रमाची रंगत आणखी वाढली. पालकांचा सकारात्मक प्रतिसाद

या वार्षिक क्रीडा दिनाला उपस्थित असलेल्या पालकांकडून कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल आणि मुलांच्या सहभागाबद्दल अत्यंत सकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्या. "मुलांना इतक्या उत्साहाने खेळताना पाहून आम्हाला खूप आनंद झाला," असे एका पालकाने सांगितले. "शाळेने केवळ अभ्यासावरच नव्हे, तर मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावरही भर दिल्याबद्दल आम्ही आभारी आहोत," असे मत दुसऱ्या एका पालकाने व्यक्त केले. मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि पालकांचा उत्साह यामुळे हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.



पूर्व-प्राथमिक मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा आणि शारीरिक हालचाली अत्यंत महत्त्वाच्या आहेत. केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकास होण्यासही यातून मदत मिळते. असेही मत काही उपस्थित पालकांनी व्यक्त केले.

खेळामुळे पूर्व-प्राथमिक मुलांमध्ये विकसित होणारी प्रमुख कौशल्ये:

शारीरिक विकास: धावणे, उड्या मारणे, फेकणे आणि पकडणे यांसारख्या हालचालींमुळे मुलांची स्नायूशक्ती, संतुलन (balance) आणि शरीराचा समन्वय (coordination) सुधारतो.

संज्ञानात्मक कौशल्ये: खेळांदरम्यान मुलांना नियम समजून घ्यावे लागतात, समस्या सोडवाव्या लागतात आणि त्वरीत निर्णय घ्यावे लागतात, ज्यामुळे त्यांच्या विचार करण्याच्या क्षमता (cognitive skills) वाढतात.

सामाजिक आणि भावनिक विकास: सांघिक खेळामुळे मुलांना एकत्र काम करणे, वाटून घेणे (sharing), एकमेकांना मदत करणे आणि शिस्तबद्ध वर्तन (sportsmanship) शिकायला मिळते.

आत्मविश्वास आणि आत्मसन्मान: शर्यतींमध्ये किंवा उपक्रमांमध्ये भाग घेऊन आणि आपले कौशल्य दाखवून मुलांचा आत्मविश्वास वाढतो आणि स्वतःबद्दलचा आदर निर्माण होतो.

एकाग्रता आणि चिकाटी: खेळताना मुलांना लक्ष केंद्रित करावे लागते, ज्यामुळे त्यांची एकाग्रता वाढते आणि ध्येय पूर्ण करण्याची चिकाटी निर्माण होते.

कार्यक्रमाच्या रूपरेषेपासून ते प्रत्यक्ष मैदानातील व्यवस्थेपर्यंत प्रत्येक गोष्ट पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका व पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शिस्तबद्धरीत्या पार पडली.

मुलांनी सादर केलेले योगासने, रिबन डान्स आणि विविध शर्यतींचे कौशल्य हे शिक्षक वर्गाच्या गेल्या काही आठवड्यांच्या सातत्यपूर्ण सरावाचे फलित होते.

मैदानाची सजावट, विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि तांत्रिक बाबी हाताळणं,चिमुकल्यांना मैदानावर धीर देणे आणि त्यांचा उत्साह वाढवणे यात पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या सर्व शिक्षकांनी मोलाची भूमिका बजावली.

पालकांसाठी उपक्रम आणि सकारात्मक प्रतिसाद

केवळ मुलांसाठीच नव्हे, तर पालकांसाठीही शाळेने विशेष मनोरंजक खेळांचे आयोजन केले होते. यामध्ये पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या आठवणींना उजाळा दिला.

पालकांचा प्रतिसाद:

क्रीडा दिनानंतर पालकांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नेटके आणि सुरक्षित होते. शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष दिले, जे खरोखर कौतुकास्पद आहे." मुलांमधील सांघिक भावना आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे पालकांनी आवर्जून नमूद केले.

पूर्व-प्राथमिक मुलांसाठी खेळाचे महत्त्व आणि विकास

पूर्व-प्राथमिक वयात खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते शिक्षणाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. महाराष्ट्र टाइम्सच्या वृत्तानुसार, अभ्यासाइतकेच खेळणे मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक आहे.

खेळामुळे विकसित होणारी कौशल्ये:

शारीरिक समन्वय: धावणे आणि उड्या मारणे यांमुळे मुलांच्या शरीराचा तोल आणि समन्वय (coordination) सुधारतो.

सामाजिक कौशल्ये: एकत्र खेळल्यामुळे मुले एकमेकांशी संवाद साधणे आणि सहकार्य करणे शिकतात.

'खेळातील लहान आव्हाने स्वीकारल्यामुळे मुलांची विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढते.'

'खेळामुळे मुलांचा ताण कमी होतो आणि त्यांच्यात खेळाडूवृत्ती (sportsmanship) निर्माण होते.'

असे विविध लिखित व मौखिक अभिप्राय पालकवर्गांनी नोंदवत आपला आनंद व्यक्त केला.

या सोहळ्याच्या यशामागे पोदार प्रेपच्या शिक्षिका कोमल खरात, पुजा पनवर, किरन येसेकर, हर्षदा मंडलिक , शिला कदम, योगीता आरोटे यांनी मोलाचे योगदान दिले तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अपार कष्ट आणि प्रशासकीय अधिकारी श्री सागर नेरपगार यांचे विशेष नियोजन कारणीभूत ठरले.

कार्यक्रमाच्या शेवटी पालकांचे आभार मानून सोहळ्याची सांगता केली.





















